सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, २६ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १८४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com





**छत्रपती संभाजीनगर** – पांडे आयर्न अँण्ड ट्रेडींग कं., शहा स्टील ट्रेडर्स, रॉयल ट्रेडर्स, वाय.के.ट्रेडर्स, **नारेगाव** – एन.के.ट्रेडर्स, **हर्सुल** – सुरेश ट्रेडर्स अँड हार्डवेअर, **बेरीबाग** – सारा ट्रेडर्स, **सावंगी** – अंजनी ट्रेडर्स, **पिसादेवी** – देवदत्त ट्रेडर्स, **शेंद्रा एमआयडीसी** – निशांत ट्रेडर्स, **करमाड** – साई बिल्डींग मटेरिअल अँण्ड सप्लायर्स, **आडुळ** – शिवकृपा ट्रेडर्स, **वाळुज एमआयडीसी** – देवांश ट्रेडींग कंपनी, **वाळुजगाव** – चंद्रपुष्प इंटरप्राईजेस, **पडेगाव** – कमलेश ट्रेडींग कं, **वैजापूर** – समर्थ ट्रेडर्स, राजाराम स्टील ट्रेडर्स, **लोणी**– बाबा ट्रेडर्स, **देवगाव रंगारी** – मराठवाडा ट्रेडर्स, **खंडाळा** – रविराज ॲग्रो एजन्सीज, **गंगापूर**– श्री महालक्ष्मी स्टील पत्रा डेपो, हरिओम ट्रेडर्स, **लासूर स्टेशन** – साई ट्रेडिंग कंपनी (मढीकर), **लिंबेजळगाव** – श्री.विठ्ठल कृपा ट्रेडर्स, **महालगाव** – महालक्ष्मी स्टील ट्रेडर्स, **शिऊर बंगला** – जलाल ट्रेडर्स, **पैठण** – संजय ट्रेडर्स, **बिडकीन** – मानधने स्टील ट्रेडर्स, **वासडी** – संतोष ट्रेडर्स, **पिशोर** – रेणुका ट्रेडर्स, **सिल्लोड** – सहारा ट्रेडर्स, **भराडी** – श्रीकृष्ण ट्रेडर्स, **गोळेगाव** – सागर ट्रेडर्स, **उंडणगाव** – श्री.गणेश ट्रेडर्स, **अंधारी** – विशाल ट्रेडर्स, **आळंद** – गजानन ट्रेडर्स, **फुलंब्री** – गजानन ट्रेडर्स, शिव ट्रेडर्स, **पाल फाटा** – योगराज ट्रेडींग कंपनी, श्री.जगदंबा स्टील ट्रेडर्स, **बोरगाव गणपती** – संजय हार्डवेअर, **सुलतानपूर** – लक्की मशिनरी स्टोअर्स, **कन्नड** – मोरया ट्रेडर्स, **विहामांडवा** – वर्धमान हार्डवेअर अँण्ड मशिनरी, **शिऊर** – विठ्ठल ट्रेडर्स, **औराळा** – बालाजी ट्रेडर्स, **पाणपोईफाटा** – भगवती स्टील, **पाचोड** – श्रीनाथ ट्रेडर्स अँण्ड हार्डवेअर, **चितेगाव** – दुर्गा स्टील ट्रेडर्स.

आयकॉन स्टील

टीएमटी बार


### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज (दि.२६) ऑरिक व बिडकीन प्रकल्पाचे ऑनलाईन लोकार्पण

छत्रपती संभाजीनगर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुरुवार दि.२६ रोजी सायंकाळी सहा वा. ऑरिक व बिडकीन प्रकल्पाचे ऑनलाईन लोकार्पण होणार आहे. या थेट प्रक्षेपणाची व्यवस्था शेंद्रा येथील ऑरिक हॉल, डीएमआयसी प्रकल्प, महाराष्ट्र आवद्योगिक वसाहत मर्या. कार्यालय येथे करण्यात आली आहे,असे प्रकल्प व्यवस्थापक अरुण दुबे यांनी कळविले आहे.

### पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

छत्रपती संभाजीनगर : पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांच्या हस्ते पंडीत उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

# दुर्दैवाने ते टिकू शकले नाही, मात्र...

## मराठा आरक्षणाबद्दल देवेंद्र फडणवीसांच सुस्पष्ट विधान

नवी मुंबई : मराठा समाज हा गेल्या काही दिवसांपासून सातत्याने आरक्षणाची मागणी करत आहे. त्याच पार्श्वभूमीवर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी नवी मुंबईत बोलताना एक मोठं वक्तव्य केलय. मराठा समाजाला त्यांचे अधिकार आणि आरक्षण हे मिळायलाच हवं, असं आमच्या सरकारचं वचन आहे. मराठा समाजाच्या या मागण्या योग्य आहेत. यातून मार्ग काढण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलंय.

स्व.आमदार अण्णासाहेब पाटील यांची ९१ वी जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या एका कार्यक्रमाला देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच हजेरी लावली. यावेळी इथे माथाडी कामगारांचा भव्य मेळावा आणि गुणवंत कामगार पुरस्कार वितरण समारंभ पार



पडला. यावेळीच देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणाबद्दल एक मोठे वक्तव्य केले.

त्यानंतर ते दुर्दैवाने टिकू शकले नाही

अण्णासाहेब पाटील यांची जयंती साजरी करण्यासाठी दरवर्षी आपण इथे जमतो. अण्णासाहेब पाटील यांच्या निमित्तानेच मराठा समाजाची चळवळ उभी झाली. मी मुख्यमंत्री होतो तेव्हा मराठा समाजाला आरक्षण दिलं होतं. देशात मराठा आरक्षण हे एकमेव आरक्षण होते, जे उच्च न्यायालयात आपण टिकवून दाखवलं. जोपर्यंत मी मुख्यमंत्री होतो, तेव्हा सर्वोच्च न्यायालयातही ते टिकलं. पण दुर्दैवाने त्यानंतर ते टिकू शकले नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मराठा समाजाची पिळवणूक आणि फरफट होता कामा नये

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात पुन्हा १० टक्के आरक्षण दिलं. मोदींनीही एथड चे आरक्षण दिलं. मराठा समाजाला त्याचाही फायदा झाला. मात्र आता सातत्याने वेगळ्या आरक्षणाची मागणी होत असल्याने शिंदेंच्या नेतृत्वात आम्ही १० टक्के आरक्षण दिले. वेगवेगळ्या मागण्या आज होत आहेत, त्या चुकीच्या आहेत असं मी म्हणणार नाही. पण आपल्याला एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की आपण जी कोणतीही मागणी मागतोय ती कायद्याच्या चौकटीत बसली पाहिजे, अन्यथा एखादा निर्णय आपण घ्यायाचा आणि कायद्याच्या चौकटी बसला नाही म्हणून न्यायालयाने तो निर्णय रद्द करायचा, अशाप्रकारची वारंवार पिळवणूक आणि फरफट मराठा समाजाची होता कामा नये. त्यामुळेच यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न आम्हीसुद्धा करत आहोत, असे देवेंद्र फडणवीसांनी म्हंटल.

मराठा समाजाला त्यांचा हक्क मिळायला हवं

मराठा समाजाने विविध समाजाचे नेतृत्व केलं आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे १८ पगड जातीचे मावळे एकमेकांच्या विरोधात उभे आहेत, महाराष्ट्रासाठी अशाप्रकारचे चित्र उभं राहणं हे योग्य नाही. ते उभं होऊ नये, असा सर्वांचाच प्रयत्न आहे. त्यामुळे मराठा समाजाला त्यांचे अधिकार आणि आरक्षण हे मिळायलाच हवं हे आमच्या सरकारचे वचन आहे. पोलीस भरतीमधेही मराठा आरक्षण दिले. मराठा समाजाला त्यांचे हक्क मिळायला हवं, तसेच त्यावेळी समाजामध्ये कुठेही दुफळी निर्माण होऊ नये. आमचा या दृष्टीने सातत्याने प्रयत्न आहे, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## शहर सहकारी बँकेच्या शाखेचा वर्धापन दिन संपन्न

### शहर सहकारी बँक ग्राहकांना देत असलेल्या आधुनिक सुविधा कौतुकास्पद - आ. जगताप



नगर : मार्केटयार्ड परिसरातील महात्मा फुले चौकात १९९३ सालापासून कार्यरत असलेल्या शहर बँकेच्या मार्केट यार्ड शाखेला स्थापनेपासूनच परिसरातील व्यापारी वर्गाचा मोठा पाठिंबा मिळाला. अगदी मोक्याच्या ठिकाणी असलेल्या या शाखेमुळे व्यापारी वर्गासह परिसरातील ज्येष्ठ नागरिक, गृहिणी, नोकरदार वर्ग यांची मोठी सोय झाली. बदलत्या काळानुसार शहर बँक देत असलेल्या अत्याधुनिक सेवा-सुविधा यामुळे बँकेने सभासद, ठेवीदार व खातेदारांचा विश्वास जिंकला आहे असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले. .

अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या मार्केटयार्ड शाखेचा ३२ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साही वातावरणात पार पडला. . यावेळी संचालक संजय घुले, डॉ. विजयकुमार भंडारी, सुजित बेडेकर, शिवाजी कदम, जयंत येलूलकर, प्रा. माणिकराव विधाते, निखिल नहार, दत्तात्रय रासकोंडा, रेश्मा आठरे- चव्हाण, सेवक प्रतिनिधी राजेंद्र गायकवाड, विशेष वसुली अधिकारी प्रकाश वैरागर, वरिष्ठ अधिकारी संजय मुळे आदि उपस्थित होते.

या कार्यक्रमाला विधानपरिषद सदस्य अरुण जगताप, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी उपमहापौर गणेश भोसले, मा. नगरसेवक अविनाश घुले, प्रकाश भागानगरे, ज्येष्ठ नागरिक तात्या दरेकर , मोहिनीराज सप्तर्षी, अनिल विधाते, अॅड. स्वाती जाधव, दीपाली आढाव, प्रिया डहाळे, दलजितसिंग वधवा आदींनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. यावेळी बँकेने सन २०२३-२०२४ या वर्षात केलेल्या आर्थिक कामगिरीचे तसेच बँकेच्या वतीने देण्यात येणाऱ्या विविध सेवा-सुविधांचे उपस्थितांनी कौतुक केले.

यावेळी आ. संग्राम जगताप यांनी बँकेचे चेअरमन सीए. गिरीश घैसास यांचा सहकार व बँकिंग क्षेत्रातील योगदानाबद्दल, ज्येष्ठ संचालक सुभाष गुंदेचा यांचे पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल तसेच व्हा. चेअरमन डॉ. भूषण अनभुले यांचे शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रातील योगदानाबद्दल सन्मानचिन्ह, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.

# नवव्या दिवशी मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण स्थगीत

तभा वृत्तसेवा

जालना , अंबड प्रतिनिधी : अंतरवालीसराटी येथे दि २५ सप्टेंबर मागील नऊ दिवसांपासून मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून जोरदार उपोषण करत असलेल्या मनोज जरांगे पाटील यांनी आज उपोषण स्थगित करत असल्याची घोषणा केली आहे. आज आपण उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेत आहोत. जे लोक इथं भेटण्यासाठी येत आहेत त्यांच्यासाठी आपण थोडा वेळ थांबू आणि आज संध्याकाळी ५ वाजता उपोषण स्थगित करू. आता उपोषण करून नाही तर सत्तेत बसून आरक्षण मिळवू आणि त्रास देणाऱ्यांना सरळ करू, असं यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.



मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या औचित्यावर १७ सप्टेंबरच्या मध्यरात्रीपासून मनोज जरांगे यांनी उपोषणास सुरुवात केली होती. पुन्हा आमच्या नावानं बोंबलत बसायचं नाही. सरकारला आम्ही शेवटची संधी देत आहोत, जर आता मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर नंतर काहीही बोलून उपयोग नाही, असा इशारा आंदोलनाच्या सुरुवातीला मनोज जरांगेंनी दिला होता. मात्र मागील नऊ दिवसांत त्यांच्या मागण्यांवर तोडगा न निघाल्याने आज जरांगे पाटील यांनी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेत निवडणुकीच्या राजकारणात उतरण्याचे संकेत दिले आहेत.

# ‘त्या’ घटनेच्या निषेधार्थ कडकडीत बंद; सकल हिंदु समाजाचा विराट मोर्चा

## चौकशीअंती कारवाई करण्याचे लांजेवार यांचे आश्वासन

तभा वृत्तसेवा

कन्नड :- रिक्षात फक्त मुलींनाच नेण्याचा अट्टाहास करणाऱ्या रिक्षाचालकाने आपल्या सहकाऱ्यांसह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह विद्यार्थिनींना जातिवाचक शिवीगाळ आणि विनयभंग करत मारहाण करून गंभीर जखमी केल्या प्रकरणी, सदरील प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी कन्नड शहरातील सकल हिंदू संघटना,सर्व पक्षीय पदाधिकाऱ्यांसह नागरिकांनी, पिशोर नाका येथून तहसील कार्यालयापर्यंत विराट मोर्चा काढला होता

पीडित मुली, पालकांनी व सकल हिन्दू समाजातर्फे उपविभागीय अधिकारी संतोष



गोरड , उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड , तहसीलदार विद्याचरण कडवकर , पोलीस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांनी निवेदन स्वीकारले. निवेदन दिल्यानंतर ही दोन पोलिसांवर कारवाई झालीच पाहिजे म्हणत मोर्चेकरी घोषणा देत उठले नाही .

या मोर्चाला सामोरे जात अप्पर पोलिस अधीक्षक सुनिल लांजेवार यांनी सांगितले की, या प्रकरणातील १) अल्लबक्ष सलिम शेख उर्फ बाबा (वय २६) रा.नितीननगर, २) रिजवान सलिम शेख (वय ३१) रा.नितीननगर,३) दानिश फरीद खान (वय २०) रा.महेताबनगर या आरोपींना अटक करण्यात आली असून इतर तीन आरोपी फरार आहेत त्यांनाही अटक केली जाईल. या आरोपींच्या विरोधात ट्रासिटी, विनयभंग, दंगा, दुखापत आणि इतर विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तरी शहर व परिसरातील नागरिकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. कोणत्याही चुकीच्या माहितीला प्रसारित करु नये. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही लांजेवार यांनी केले.

या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड हे स्वतः करत आहे त्यांना पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर, सहायक पोलिस निरीक्षक कुणाल सुर्यवंशी, रामचंद्र पवार,पोलिस हेड कॉन्स्टेबल कैलास निंभोरकर हे सहकार्य करत आहेत.

मोर्चामुळे कुठल्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये यासाठी पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. शहरातील सर्वच व्यावसायिकांनी सकाळ पासून आपली दुकाने उत्स्फूर्त पणे बंद ठेऊन पिशोर नाका येथे जमा होण्यास सुरुवात केली होती. कन्नड शहरात सकल हिंदू समाज बांधवांनी काढलेला हा मोर्चा आतापर्यंतचा सर्वात मोठा मोर्चा असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होती.

तर दुसऱ्या एका निवेदनाद्वारे मुलींना छेडछाड करुन मारहाण करणाऱ्या आरोपींच्या विरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी, तेलवाडी येथील वाल्मीक नाईक कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्यांनी केली आहे.

# फर्दापूर परिसरात जोरदार पाऊस



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि २५ . बुधवारी सकाळी फर्दापूर परिसरात जोरदार पाऊस झाला असून काही ठिकाणी नुकसान तर काही ठिकाणी फायदा झाला आहे काही शेतकरी यांनी मका पिकाची सोंगणी केली असल्याने नुकसान झाले आहे तर कपाशी पिकाला थोडा प्रमाणात फायदा झाला आहे या अवकाळी पावसामुळे नदी नाले यांना मोठ्या प्रमाणावर पुर आला तसेच वाघुर नदीला पूर आला आहे

## स्टेट लेवल बेल्ट रेसलिंग व मास रेसलिंग स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरने जिंकले चार सुवर्ण एक रोप्य पदक



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २५ सप्टेंबर जळगाव, अमळनेर येथे दि २१ते २२ सप्टेंबर रोजी झालेल्या स्टेट लेवल बेल्ट रेसलिंग व मास - रेसलिंग स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरने चार सुवर्ण एक रोप्य व एक कांस्यपदक जिंकले खालील प्रमाणे विजेयी विद्यार्थ्यांचे नावे.१) यशोधन पवन घुगे (सुवर्ण पदक )२) अर्णव राजेंद्र रिडलॉन (सुवर्ण कांस्यपदक)३) शाम माधवराव बुधवंत ( सुवर्ण पदक )४) सोम्या विजय कुमार (सुवर्ण व रोप्य पदक )

यांनी बेल्ट रेसलिंग व मास - रेसलिंग मध्ये पदक जिंकले.या सर्व विद्यार्थ्यांना बेल्ट रेसलिंग व मास - रेसलिंग छत्रपती संभाजीनगर संघटनेचे अध्यक्ष /व सचिव, प्रशिक्षक .पवन घुगे, प्रविण घुगे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.व ऑक्टोबर महिन्यात देहारधून येथे होणाऱ्या राष्टीय स्पर्धेसाठी विद्यार्थी निवड झाली आहे.या सर्व विद्यार्थ्यांना स्टेट ट्रॅडिशनल बेल्ट रेसलिंग चे अध्यक्ष मा. सी. ए. तांबोळी, व संतोष खैरनार पवन घुगे, प्रविण घुगे, राधा घुगे, नंदा घुगे राम चौरे, गौरव टोकटे ,व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### आयफा ‘स्टीलएक्स २०२४’ प्रदर्शन, राष्ट्रीय अधिवेशन मुंबईत संपन्न

# पर्यावरणपुरक ‘ग्रीन स्टील’ निर्मिती ही भविष्यातील गरज

मुंबई : आयफा स्टीलएक्स २०२४ प्रदर्शन दि. १८ आणि १९ सप्टेंबर रोजी मुंबई एक्झिबिशन सेंटर येथे पार पडला. ज्यात संपूर्ण भारतातून ८०० हून अधिक स्टील उद्योजक, बांधकाम व्यावसायिक आणि तज्ज्ञ सहभागी झाले होते.

या कार्यक्रमाला केंद्रीय स्टील व अवजड उद्योग मंत्री एच. डी. कुमारस्वामी, सन्माननीय राज्य मंत्री (स्टील व अवजड उद्योग) भूपती राजू श्रीनिवास वर्मा, स्टील मंत्रालयाचे सचिव संदीप पोंडरिक आणि सहसचिव अभिजित नरेंद्र हे उपस्थिती होते. या परिषदेमध्ये केवळ भारतातीलच नव्हे तर नेपाळ, श्रीलंका आणि इथिओपिया यांसारख्या शेजारील देशांतील उद्योजकांचा सहभाग होता, ज्यामुळे या कार्यक्रमाचे जागतिक महत्त्व वाढले.

आयफाचे अध्यक्ष योगेश मानधनी, महासचिव कमल अग्रवाल



**मुंबई : केंद्रीय स्टील व अवजड उद्योग मंत्री एच. डी. कुमारस्वामी यांचे सन्मान चिन्ह देऊन स्वागत सत्कार करताना आयफाचे अध्यक्ष योगेश मानधनी, सचिव कमल अग्रवाल, बालसुब्रमन्यम प्रभाकरण आदी.**

यांच्या नेतृत्वात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शाश्वतता आणि स्टील उद्योगाच्या भविष्यासाठी आव्हानांचा सामना करण्यावर या कार्यक्रमात विशेष भर दिला गेला. योगेश मानधनी यांनी त्यांच्या भाषणात स्टील उद्योगातील शाश्वततेच्या महत्त्वावर प्रकाश टाकला आणि सेंकडरी स्टील क्षेत्राच्या मोठ्या योगदानाचा उल्लेख केला, ज्याचा भारताच्या एकूण स्टील उत्पादनात ५३ टक्के वाटा आहे. त्यांनी सरकारला लहान, मध्यम आणि मोठ्या उद्योगांसाठी कच्चा माल आणि विशेषतः लोह धातूचा साठा मिळवून देण्यासाठी समर्पित खाणी प्रदान करण्याचे आवाहन केले. तसेच स्क्रॅपिंग धोरण, ग्रीन स्टील नवकल्पना आणि उद्योगवाढीसाठी बीआयएस नियमांचे अद्ययावत करण्याची गरजही मांडली. त्यांनी स्टील आयातीवर निर्बंध घालण्याचाही मुद्दा उपस्थित केला. स्टील मंत्रालयातील मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या सर्व मुद्द्यांवर सहकार्याची ग्वाही यावेळी दिली, जेणेकरून या क्षेत्राचा शाश्वत विकास सुरू राहील. दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात आठ विशेष सत्रे आयोजित करण्यात आली, ज्यात युवा, दुसऱ्या पिढीतील तरूण उद्योजकांनी शाश्वतता, संसाधन कार्यक्षमता आणि तंत्रज्ञानातील नवकल्पनांवर विचारमंथन केले. १०० हून अधिक प्रदर्शनकर्त्यांनी सहभाग घेतला, ज्यांनी स्टील उत्पादनाच्या भविष्याला आकार देणारे प्रगत तंत्रज्ञान आणि उपाय येथे सादर केले.

आयफा स्टीलएक्स २०२४ चा समारोप प्रतिष्ठित ‘इस्पात उद्योग रतन पुरस्कार’ देऊन करण्यात आला, ज्यामध्ये १८ उद्योजकांना स्टील क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी गौरविण्यात आले.

**स्टीलएक्स २०२४ हा शाश्वत स्टील उत्पादक संघटना आयफाद्वारे आयोजित वार्षिक कार्यक्रम आहे. जो स्टील क्षेत्रातील उद्योजक, शासकीय अधिकारी आणि नवकल्पक उद्योजक यांच्यातील सहकार्याला प्रोत्साहन देतो. कार्यक्रमाचा उद्देश उद्योगातील शाश्वत नवकल्पना आणि प्रगतीवर लक्ष केंद्रित करणे आहे, ज्यामुळे उद्योगाच्या भविष्यातील वाटचाल ठरवली जाते.**

**–योगेश मानधनी, अध्यक्ष, आयफा.**

# नववीच्या वर्गासाठी हायकोर्टात जाणार!

## शालेय समितीचे विधि सल्लागार ॲड. जाधव यांचा इशारा

वाळुज महानगर प्रतिनिधी: काल दिनांक २४ सप्टेंबर रोजी 'दै तरुण भारत'च्या अंकामध्ये 'साजापूरला नववीचा वर्ग नाकारला'या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्तामुळे आता पालक विद्यार्थीच नाही तर शालेय कमिटीने सुद्धा या आंदोलनात उडी घेतली असून, शालेय कमिटीचे विधी सल्लागार ड.सचिन जाधव यांनी तर थेट मा. न्यायालयात दावा दाखल करणार असल्याचे सांगितले आहे.



साजापूर येथील जिल्हा परिषद शाळेत नववी मध्ये एकूण ५० विद्यार्थी संख्या असून त्यापैकी २७ मुली व २३ मुले आहेत. तसेच बसण्यासाठी स्वतंत्र खोली ही उपलब्ध आहे .शासनाने संबंधित शाळेला नववी वर्गातील मुलांना टीसी देण्याचे आदेश दिले होते, त्यानुसार टीसी देण्याची कार्यवाही शाळेच्या वतीने करण्यात आली होती परंतु या शाळेतील ५० विद्यार्थ्यांच्या पालकांनी टीसी न काढता याच शाळेत मुलांना शिकवू असा पवित्रा घेतला. तसेच जर नववीचा वर्ग मिळाला नाही तर उपोषणाला बसू असा इशाराही दिलेला आहे. त्यातच येथील सामाजिक कार्यकर्ते जाफर पटेल व शालेय कमिटीचे विधी सल्लागार ड. सचिन जाधव यांनी या आंदोलनात उडी घेतल्यामुळे हे आंदोलन यशस्वी होणारच अशी शाश्वती नागरिकांनी व्यक्त केली. सामाजिक कार्यकर्ते जाफर पटेल हे या शाळेला नववी वर्गाची मान्यता मिळविण्यासाठी शासन दरबारी गेल्या सहा महिन्यापासून पत्रव्यवहार करत आहेत. तसेच जालना जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार कल्याण काळे यांचे शिफारस पत्र ही शिक्षणाधिकारी यांना दहा सप्टेंबर रोजी देण्यात आले होते, व २७ ऑगस्ट रोजी जाफर पटेल यांनी औरंगाबाद पश्चिम तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी छत्रपती संभाजी नगर यांच्या नावे पत्रव्यवहारही केला होता परंतु या सर्व प्रक्रियेला कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे तसेच शैक्षणिक सत्र अर्ध्यावर आल्यानंतर नववीच्या वर्गाला मान्यता मिळणार नाही असे जर कळविण्यात येत असेल तर निश्चितच याविषयी पालक व विद्यार्थ्यांची फसवणूक होत असल्याने वाढीव ९ वी ची मान्यता न दिल्यास जन आंदोलन उभारल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही असे सांगितले. तर शालेय कमिटीचे विधी सल्लागार ड. सचिन जाधव यांनी 'तरुण भारत'ला सांगितले. येत्या दहा दिवसांत जर जिल्हा परिषद शाळा साजापूर येथे नववीच्या वर्गाला मान्यता मिळाली नाही तर आम्ही पालकांसह माननीय उच्च न्यायालयात याचिका दाखल करू असा इशारा दिला आहे. विद्यार्थी व पालकांसह या लढ्यामध्ये सामाजिक कार्यकर्ते जाफर पटेल व विधी सल्लागार ड. सचिन जाधव यांनी ही उडी घेतल्याने पालकांच्या या आंदोलनाला बळ मिळाले आहे. त्यामुळे शासन स्तरावर या शाळेविषयी काय निर्णय लागतो हे पाहणे योग्य ठरणार आहे.

अधिक माहितीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांना संपर्क साधला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही तर शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी सर्व ऐकून घेत 'मिटिंग मध्ये आहे नंतर बोलते' अशा तोडक्या शब्दात उत्तर याविषयी बोलण्याचे टाळले. या शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते किंवा नाही याचे शिक्षण विभागाला काही देणे घेणे नसल्याचे दिसून येत आहे. साजापूर येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये नववीचा वर्ग सुरु होण्यासाठी अधिकारीच उदासीन असल्याचे दिसून येत आहे.

# रस्ता अडवल्याने लक्ष्मीनगरच्या नागरिकांचे पोलिसांना निवेदन

तभा वृत्तसेवा

पैठण दि २५ :- लक्ष्मीनगर मधून शेवगाव रस्त्यावर जाणार रस्ता चेमटे किराणा जवळ खाटीकवाडा येथील दोघांनी अडवून रस्ता आमचा असून या रस्त्यावरून याजयाचे असेल तर पैसे द्या म्हणून शिवीगाळ दमदाटी केल्या प्रकरणी लक्ष्मीनगरच्या शेकडो महिला तसेच नागरिकांना पैठण पोलिसात धाव घेऊन निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे.



बहुतांश इनामी जमिनीवर वसलेले शहरातील लक्ष्मीनगर भागातील शेवगाव, शहागड फाटा कमानी कडे जाणारा १२ फूट रुंदीचा रस्ता चेमटे यांच्या किराणा जवळ शेख ईसाक शेख हसन, शेख आरेफ शेख ईसाक रा. खाटीकवाडा पैठण यांनी अडवून रस्त्याची जागा आमची म्हणत नागरिकांना या रस्त्यावर जाण्यास मनाई केली. रस्त्यावर जायचे असल्यास पैसे द्या असे म्हणत शिवीगाळ करून धमकावल्या प्रकरणी लक्ष्मीनगरच्या शेकडो महिला तसेच नागरिकांनी पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांना निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे.

# बिडकीन येथे धनगर समाज कडून रस्ता रोको आंदोलन व पायी रॅली

तभा वृत्तसेवा


बिडकीन दि .२४ सप्टेंबर पैठण तालुक्यातील बिडकीन येथे सकल धनगर समाजाच्या वतीने दि .२३ सोमवार रोजी सकाळी ११ वाजता खंडोबा मंदिर ते निलजगाव फाट्यापर्यंत पायी रॅली काढून रस्ता रोको आंदोलन करण्यात आले, धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलतीची अंमलबजावणी करावी, अनुसूचित जमातीच्या एस टी प्रवर्गात समाविष्ट करणे, अभ्यास समितीची स्थापना करणे या मागणीसाठी बिडकीन येथे धनगर समाज बांधवांकडून रॅली व रस्ता रोको करण्यात आले सरपंच अशोक धर्मे यांच्या नेतृत्वाखाली निलजगाव फाटा येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले, या वेळी विविध मागण्यांचे निवेदन तलाठी सचिन काशीकर यांना देण्यात आले याप्रसंगी सरपंच अशोक धर्मे, अंकुश धर्मे, कैलास धर्मे, गणेश काळे, आप्पासाहेब खंडागळे, ज्ञानेश्वर रहाटवाडे,भागचंद भालेकर, ज्ञानेश्वर कोल्हे, लक्ष्मण रहाटवाडे, प्रकाश बनसोडे, मंगलताई धर्मे, सविता कोरडे, लक्ष्मीबाई कोरडे,परीगाबाई गाढे, कल्पना धर्मे,छाया धर्मे,साकरबाई पंडीत,मंदाबाई भालेकर,आदींसह बिडकीन व परिसरातील धनगर समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती या वेळी पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण गिते, पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, अशोक माने, सहाय्यक फौजदार महादेव निकाळजे, अशोक सोकटकर, शिवानंद बनगे, संजय चव्हाण, राहुल बल्लाळ,एस एस कदम, ढवळे, यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



# दहाव्या अजिंठा वेरूळ आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या मानद अध्यक्षपदी प्रसिध्द दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांची नियुक्ती

छत्रपती संभाजीनगर, दि. २५ : ऑस्कर नामांकित लगान, स्वदेस, जोधा अकबर, पानिपत यांसारख्या अनेक महत्वपूर्ण चित्रपटांचे दिग्दर्शक व निर्माते आशुतोष गोवारीकर यांची दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या मानद अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे.

नाथ ग्रुप, महात्मा गांधी मिशन व यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र छत्रपती संभाजीनगर प्रस्तुत व मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशनच्या वतीने सदरील महोत्सव केंद्र सरकारचे सुचना व प्रसारण मंत्रालय, एनएफडीसी व महाराष्ट्र शासनाच्या विशेष सहकार्याने संपन्न होतो. यावर्षी महोत्सवाचे दहावे वर्ष असणार आहे. छत्रपती संभाजीनगर येथे १५ ते १९ जानेवारी २०२५ दरम्यान महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. याअनुषंगाने मानद अध्यक्षपदी आशुतोष गोवारीकर व महोत्सव संचालकपदी (फेस्टिवल डायरेक्टर) प्रसिध्द चित्रपट दिग्दर्शक सुनिल सुकथनकर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.



महोत्सवाच्या नव्या संयोजन समितीची घोषणा महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल व प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम यांनी या पत्रकाद्वारे करीत असल्याचे जाहीर केले आहे.

महोत्सवाच्या संयोजन समितीच्या मानद अध्यक्षपदी भारतीय सिनेमा ऑस्करपर्यंत पोहचविणारे प्रसिध्द चित्रपट दिग्दर्शक व निर्माते आशुतोष गोवारीकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. श्रीयुत गोवारीकर यांनी आपल्या अभिनय, दिग्दर्शन व निर्मिती प्रक्रियेद्वारे भारतीय सिनेजगतात मागील तीन दशकांहून अधिक काळापासून उल्लेखनीय योगदान दिले आहे.

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे मा.मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण रोजगार मेळाव्याचे आयोजन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२५ सप्टेंबर

**दि.२६ व २७ सप्टेंबर रोजी विविध नामांकित कंपन्यांमध्ये युवकांना मिळणार रोजगार**

अजिंठा शिक्षण संस्थेचे संत ज्ञानेश्वर महाविद्यालय व औद्योगिक प्रशिक्षण संस्था सोयगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मा.मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण रोजगार मेळावा दि.२६ व २७ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आला आहे. तरी तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी कला,वाणिज्य, विज्ञान व एम.सी.व्ही.सी,आयटीआय डिप्लोमा (पदविका) व पदवी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या शैक्षणिक कागदपत्रासह २६ व २७ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वा.या रोजगार मिळाव्यात सहभाग घ्यावा जेणेकरून उपलब्ध विविध नामांकित आस्थापना व कंपन्यांमध्ये त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल.सोयगाव तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावे असे आवाहन संत ज्ञानेश्वर महाविद्यालय व आयटीआय प्रशासनाने केले आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ८४/२०२४

अर्जदारः- १ शंकर रामा गिन्हे, वय ४८ वर्ष, धंदा-मजुरी, रा. काळदरी, पो. वडगाव तीग्जी ता. सोयगाव, जि. औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर २ पुनाजी रामा गिन्हे, वय ४१ वर्ष, धंदा मजुरी, रा. दस्तापुर, पो. वडगाव तीग्जी ता. सोयगाव, जि. औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर ३ गंगुबाई एकनाथ कातवारे, वय ४३ वर्ष, धंदा- मजुरी, रा. नागापूर, ता. कन्नड, जी. औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत रामा बारकु गिन्हे हे दिनांक ०२/१२/२०२३ रोजी काळदरी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत रामा बारकु गिन्हे यांचे वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र

देण्यात येईल. पुढील तारीख ५/१०/२०२४

आज दिनांक २४/९/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क. ३९६/२०२४

अर्जदार : १. ज्ञानेश्वर पि. शहादु मुंजाळ, वय ४० वर्षे, शेती, २. तुळसाबाई भ्र. नामदेव सातपुते, वय ४३ वर्ष, धंदा घरकाम, ३. कडुबाई भ्र. शहादु मुंजाळ, वय ६० वर्ष, धंदा घरकाम, सर्व रा. खडकनारळा, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड. बी.आर.राजपुत यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार क. ३ ही अर्जदार क. १ व २ यांची आई असुन अर्जदार क. ३ चे पती म्हणजेच अर्जदार क. १ व २ चे वडील नामे शहादु पि. लक्ष्मण मुंजाळ, रा. खडकनारळा, ता. गंगापुर हे दिनांक २९/०१/२०२४ रोजी मौजे खडकनारळा, ता. गंगापुर येथे मयत झाले असुन त्यांचे पाठीमागे अर्जदार हे एकमेव वारस आहेत. अर्जदारांना शासकीय कामाकरीता ते मयताचे एकमेव वारस असल्याबाबत हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशिप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्याने आज दिनांक २५/०९/२०२४ रोजी दिले.

आदेशानुसार

सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम ए.क. ३५५/२०२४ प्रकरणात पुढील ता-४/१०/२०२४

अर्जदार : १) सरस्वती वसंत शिंदे, वय ६९ वर्ष, धंदा घरकाम, रा. नवरत्न सीएचएस ४/५०६ जाकु क्लब भुमी टॉवर समोर, सांताक्रुझ, मुंबई २) स्मिता वसंत शिंदे, वय ४२ वर्ष, धंदा घरकाम, रा. ४/५०६ नवरत्न सीएचएस, जाकु क्लब, ओपो. भुमी टॉवर, सांताकुझ ईस्ट, मुंबई. ३) सुप्रिया सचिन वानखेडे, वय ४० वर्ष, धंदा घरकाम, रा. अजय अपार्टमेन्ट, रूम नं २, एम आय डी सी रोड जवळ, म्हरोल, ता. कल्याण जि. ठाणे. ४) सचिन वसंत शिंदे, वय ३५ वर्ष, धंदा मजुरी, रा. ओपो भुमी टावर, जाकु क्लब ४/५०६, नवरत्न को. ओ. हो.सौ.लि., सांताक्रुझ ईस्ट, मुंबई ५) संकेत वसंत शिंदे, वय ३३ वर्ष, धंदा मजुरी, रा. नवरत्न सीएचएस ४/५०६ जाकु क्लब भुमी टॉवर समोर, सांताक्रुझं, मुंबई

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस. एन. साबणे, गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वर नमुद ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क १ हि अर्जदार क २ ते ५ यांची आई असुन अर्जदार क-२ ते ५ हे आपसात सख्खे बहिनी आहेत. अर्जदार क १ चे पति व अर्जदार क २ ते ५ यांचे वडील नामे वसंत राधाजी शिंदे हे दि. १७/०३/२०१५ रोजी YSBYTY GWYNEDD Hospital BANGOR येथे म्हणजेच परदेशात मयत झालेले आहे. परंतु मयताचा मुळ गांव हे घोडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद हेच असल्याने त्यांचा अंतिविधी देखील मौजे घाडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथेच करण्यात आलेला असुन त्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय घाडेगांव यांनी मृत्युचे प्रमाणपत्र देखील दिलेले आहे. मयत वसंत रंथाजी शिंदे यांना अर्जदार क १ हि पत्नी व अर्जदार क २ व ३ या मुली व अर्जदार क ४ व ५ हे मुले हेच कायदेशीर वारसदार आहेत. मयत वसंत रंधाजी शिंदे यांना अर्जदार क १ ते ५ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाही. मयत वसंत रंधाजी शिंदे यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारसं प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवाया, त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन.

आज दि.१०/०९/२०२४ रोजी माझ्या सहिनें व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपिक — सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

संचिका क्र.२०२४/३.वि.अ.वे./एम.ए.जी./ज.म.नोंद/सी.आर / २०२४ दिनांक :- २५/०७/२०२४.

अर्जदार :- श्री/श्रीमती एकनाथ रामनाथ चापे रा मुरमी ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्राम पंचायत कार्यालय दहेगांव/मुरमी/सारंगपूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११ (२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार वडील नामे रामनाथ दगडू चापे यांचा मृत्यु दिनांक १०//०८/१९८३ रोजी मौजे मुरमी ता. गंगापूर दहेगांव/मुरमी/सारंगपूर ता. गंगापूर अर्ज दाखल केला आहे. येथे झाला असून ग्राम पंचायत कार्यालय येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला मृत्यु नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक २५/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.

दिनांक :- २५/०७/२०२४.

उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

## जाहीर प्रगटन

संचिका क्र.२०२४/३.पि.अ.वै./एम.ए.जी./ज. मृ. नोंद/सी.आर / २०२४ दिनांक : १८/०९/२०२४,

अर्जदार :- श्री/श्रीमती मंगल दिगंबर गिरी रा. वाळुज ता. गंगापूर. जि. छत्रपती संभाजीनगर.

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय वाळुज ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांची मुलगी नामे पायल दिगंबर गिरी यांचा जन्म दिनांक १५/०६/२०१५ रोजी मौजे वाळुज ता. गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय वाळुज ता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक १८.०९.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.

दिनांक :- १८/०९/२०२४.

उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. रतर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क. २४७/२०२४ प्रकरणात पुढील ता. २५/९/२०२४

अर्जदार : १) कडुबाई भ्र. दामोदर शिंदे, वय ७१ वर्ष, धंदा घरकाम, रा. ओपो भुमी टावर, जाकु क्लब, फ्लॅट नं ५०४, बिल्डींग नं १ नवरत्न को. ओ. सोसायटी, सांताक्रुझ ईस्ट, मुंबई २) शितल पिता दागोदर शिंदे, वय ३१ वर्ष, धंदा घरकाम, रा. ओपो भुमी टावर, जाकु क्लब, फ्लॅट नं ५०४, बिल्डींग नं १ नवरत्न को. ओ. सोसायटी, सांताक्रुझ ईस्ट, मुंबई. ३) आशा पिता दामोदर शिंदे, वय २९ वर्ष, धंदा घरकाम, रा. ओपो भुमी टावर, जाकु क्लब, फ्लॅट नं ५०४, बिल्डींग नं १ नवरत्न को. ओ. सोसायटी, सांताक्रुझ ईस्ट, मुंबई.

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस. एन. साबणे, गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वर नमुद ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क १ हि अर्जदार क २ व ३ यांची आई असुन अर्जदार क २ व ३ हे आपसात सख्खे बहिनी आहेत. अर्जदार कं १ चे पति व अर्जदार क २ व ३ यांचे वडील नामे दामोधर रंधाजी शिंदे हे दि.०५/०२/२०२४ रोजी मौजे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत दामोधर रंधाजी शिंदे यांना अर्जदार क १ हि पत्नी व अर्जदार क २ व ३ या मुली हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहेत. मयत दामोधर रंधाजी शिंदे यांना अर्जदार क १ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाही. मयत दामोधर रंधाजी शिंदे यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन.

आज दि.१०/०९/२०२४ रोजी माझ्या सहिने वया न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

लिपिक — सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**माननिय दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज कं. ३९९/२०२४

अर्जदार - १. वाल्मिक नाना पाठे, वय ४६ वर्ष, धंदा शेती, रा. भोयगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर २. लक्ष्मीबाई बाबुराव साळुंके, वय ७४ वर्ष, धंदा शेती, रा. हदियाबाद, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार -निरंक

विषय - कलम २ बॉम्बे रेगूलेशन कायदयाप्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी ॲड. भगवान एस. शिंदे यांच्या मार्फत या मा. न्यायालयात अर्जदार यांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे, सदरील अर्जात अर्जदार यांनी म्हटले आहे की, असे की, अर्जदार कं. १ व २ हि मयत अन्नपुर्णाबाई नाना पाठे यांची मुले व मुली आहेत. अन्नपुर्णाबाई नाना पाठे हया दिनांक ३०/०३/२०२३ रोजी मौजे भोयगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत. मयत अन्नपुर्णाबाई नाना पाठे यांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारसादार नाहीत. अर्जदार अर्जासोबत मयताचे मुत्युप्रमाणपत्र व अर्जदार यांचे आधार कार्ड जोडत आहे. असे की, अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी ते मयत अन्नपुर्णाबाई नाना पाठे यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे वारसाचे प्रमाणपत्राची अवश्यकता असल्यामुळे, त्याकामी त्यांनी मा. न्यायालयातुन कायदेशीर वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. असे की, मयत अन्नपुर्णाबाई नाना पाठे यांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार यांनी या अर्जा व्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयात ते मयत अन्नपुर्णाबाई नाना पाठे यांचे वारसदार आसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला नाही.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांना ते मयताचे कायदेशीर वारसदार आसल्याचे प्रमाणपत्र देण्यास ज्या कोणाचा उजर व आक्षेप आसेल अशानी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत त्यांचा उजर व आक्षेप या न्यायालयात नोंदवावा. मुदतीमध्ये कोणाचा उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल, मुदतीनतंर आलेला उजर व आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

पुढील तारीख ०८/११/२०२४.

आज दिनांक २५/०९/२०२४ रोजी माझ्या सही व न्यायालयाक्ष्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपिक — सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ८८/२०२४

अर्जदार : १. गयाबाई साहेबराव मरसाळे, वय ७५ वर्ष, धंदा-मजुरी, रा. नायगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद. छत्रपती संभाजीनगर २. विमलबाई रमेश खैरनार, वय ५५ वर्ष धंदा- मजुरी, रा. सायगव्हान, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. छत्रपती संभाजीनगर). ३. जिजाबाई शांताराम मांग भालेराव, वय ४७ वर्ष, धंदा मजुरी, रा. आसनखेडा, ता. पाचोरा, जी. जळगाव. ४. सांडू साहेबराव मरसाळे, वय ४८ वर्ष, धंदा-मजुरी रा. बनोटी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद. छत्रपती संभाजीनगर ५. पांडुरंग साहेबराव मरसाळे, वय-५३ वर्ष, धंदा-मजुरी, रा. अंभई, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत साहेबराव ओंकार मरसाळे हे दिनांक २६/१०/२०२२ रोजी बनोटी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत साहेबराव ओंकार मरसाळे यांचे वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २२/१०/२०२४

आज दिनांक २४/९/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ९२४/२०२४

अर्जदारः- १. नर्मदाबाई महादू कन्हाळे, वय ७५ वर्ष, धंदा-घरकाम, रा. गोंदेगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर २. नाना महादू कहन्हाळे, वय ५५ वर्ष, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे. ३. अण्णा महाद् कन्हाळे, वय ४५ वर्ष, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे. ४. हेमराज महाद् कन्हाळे, वय ४३ वर्ष, धंदा-मजुरी राः वरीलप्रमाणे ५. अलकाबाई अशोक जाधव, वय-४० वर्ष, धंदा- मजुरी रा. वरीलप्रमाणे

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत महादू सखाराम कन्हाळे हे दिनांक ११/०२/२०२१ रोजी गोंदेगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत महादू सखाराम कन्हाळे यांचे वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २२ /१०/२०२४

आज दिनांक २४/९/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क-स्तर सोयगाव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १२२/२०२४

अर्जदारः- १. बेबीबाई दगा मोरे, वय ७२ वर्ष, धंदा-घरकाम, रा. पो. वडगाव तीग्जी ता. सोयगाव, जि. औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर २. कैलास दगा मोरे, वय ४६ वर्ष, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे. ३. शरद दगा मोरे, वय ४१ वर्ष, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे. ४. नंदकिशोर दगा मोरे, वय ३९ वर्ष, धंदा-मजुरी रा. वरीलप्रमाणे

विरुध्द

गैरअर्जदारः कोणीही नाही

प्रकरणः वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते कि, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. ए. व्ही. जाधव, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत दगा आप्पा मोरे हे दिनांक २६/०१/२०२४ रोजी वडगाव तीग्जी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकिलामार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत दगा आप्पा मोरे यांचे वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरिता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १९/१०/२०२४ आज दिनांक २४/९/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर सोयगाव

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# तेर येथील जि.प.प्रा. शाळेतील शिक्षकांचा कडकडीत बंद



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२५ सप्टेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील पाचही प्राथमिक जिल्हा परिषद प्रशालेतील सर्वच शिक्षक, शिक्षिका विविध मागण्यासाठी सामुहिक रजेवर २५ सप्टेंबरला गेल्याने कडकडीत बंद पाळण्यात आला.

धाराशिव तालुक्यातील तेर येथील जि.प. कन्या शाळा, जि.प. केंद्रीय शाळा, जि.प. पेठ शाळा, जि.प. स्पेशल शाळा, जि.प. उर्दू शाळेतील प्राथमिक विभागाचे सर्वच शिक्षक, शिक्षिका विविध मागण्यासाठी २५ सप्टेंबरला सामुहिक रजेवर गेल्याने तेर येथील सर्वच प्राथमिक जिल्हा परिषद प्रशालेत एक दिवसीय कडकडीत बंद पाळण्यात आला. त्यामुळे तेर येथील सर्वच प्राथमिक जिल्हा परिषद शाळा बंद होत्या.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### सकल मराठा समाजाचे तुळजापूरात बोंब मारो आंदोलन

**तुळजापूर, दि.२५ सप्टेंबर -**

मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील यांची प्रकृती खालावत असताना देखील शासन मराठा आरक्षण मागणी दखल घेत नसल्याच्या निषेधार्थ सकल मराठा समाजाने मंगळवार दि.२४ रोजी शासन व शासनातील मंत्र्याच्या निषेधार्थ बोब मारीत मोर्चा काढत शासनाचा निषेध केला. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासुन या बोंब मारो आंदोलनास आरंभ झाला. या आंदोलनात शासन तसेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या निषेधाचा घोषण देत बोंब मारीत तहसिल कार्यालयाजवळ शासनाचा जाहीर निषेध केला. या आंदोलनात सकल मराठा समाज शहर व तालुक्यातील सहभागी झाले होते.



### मनोज जरांगे यांना पाठिंबा देण्यासाठी लोहाऱ्यात साखळी उपोषणास सुरुवात

**लोहारा, दि.२५ सप्टेंबर -**

उपोषणकर्ते संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी लोहारा येथे सकल मराठा समाच्यावतीने लोहारा तहसील कार्यालयासमोर दि.२५ सप्टेंबर पासुन साखळी उपोषणास सुरुवात करण्यात आली आहे. जोपर्यंत संघर्ष योद्धा मनोज पाटील यांच्या मागणीला यश मिळत नाही त्यांचे उपोषण थांबत नाही, संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांचे आदेश मिळेपर्यंत साखळी उपोषण सुरु राहील, असे सकल मराठा समाजाच्यावतीने सांगण्यात आले. या उपोषणात शरद पवार, बालाजी यादव, लक्ष्मण पवार, अनंत पवार, महादेव गिरी, अजित मोटे, हणमंत रवळे, महादेव मगर, महेश गोरे, सहभागी आहेत.



### इटकळ बुद्ध विहारात गुणवंताचा नागरी सत्कार

**इटकळ, दि.२५ सप्टेंबर -**

इटकळ बुद्ध विहारांमध्ये सायंकाळी साडेसात वाजता भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्ष राजश्री कदम यांच्या अध्यक्षतेखाली गुणवंताचा सत्कार आणि समाज रत्न पुरस्कार प्राप्त आर.एस. गायकवाड यांचा यांच्या नागरी सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमास सरपंच साहेबा क्षीरसागर, उपसरपंच फिरोज मुजावर, ग्रामपंचायत सदस्य अमोल पाटील, राहुल बागडे, रफिक मुजावर, अब्दुल शेख हे मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकामध्ये बाळू बागडे गुरुजी यांनी आदिनाथ बागडे पुणे व मीनाक्षी बागडे यांच्या सामाजिक कार्यात गौरव केला. यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या नूतन जिल्हाध्यक्ष राजश्री कदम यांचा इटकळ बौद्ध बांधवांच्या वतीने सत्कार करण्यात आला. या नागरी सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन अनिल बागडे, विलास दुपारगुडे, भारत बागडे, आदिनाथ बागडे, मीनाक्षी बागडे आणि त्यांच्या सहकार्याने केले होते.



### समाजवादी पार्टी जिल्हाअध्यक्ष पदी अमीर शेख यांची निवड

**तुळजापूर, दि.२५ सप्टेंबर -**

समाजवादी पार्टी जिल्हाध्यक्ष पदी आमीर ईब्राहीम शेख यांची निवड करण्यात आली. रविवार दि.२३ रोजी समाजवादी पार्टी मुंबई येथील कार्यालयात अमीर शेख आपसिंगा यांना समाजवादी पार्टीच्या उस्मानाबाद जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आले व नियुक्ती पत्र देण्यात आले. समाजवादी पार्टीचे मुंबई महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा आमदार अबु आसिम आझमी यांच्या आदेशानुसार समाजवादी पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष प्रतापराव होगाडे, जनरल सेक्रेटरी परवेझ सिद्धीकी, डॉ. अब्दुल रौफ शेख, प्रदेश कार्यकारणी अँड.रेवन भोसले उपस्थिती होते. समाजवादी पार्टी जिल्हाध्यक्ष पदी अमीर शेख यांच्या निवडीचे वृत्त कळताच फटाके फोडुन आनंदोत्सव साजरा केला.

# परंडा मतदार संघात तानाजी सावंत यांच्या विरोधात महाविकास आघाडीचा उमेदवार कोण?







**तभा वृत्तसेवा / आप्पासाहेब शिंदे**
**परंडा, दि.२५ सप्टेंबर -**

परंडा विधानसभा मतदारसंघात विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी कोण कोण इच्छुक आहेत हे लवकरच कळेल येत्या दहा ते पंधरा दिवसात अचारसंहीता लागू शकते. त्यामुळे परंडा मतदारसंघात तिरंगी किंवा चौरंगी लढत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत हे पुन्हा विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात पूर्ण ताकतीने उतरत असून त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीचा उमेदवार कोण? राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी आ. राहुल मोटे की शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील याची चर्चा ही मतदार संघात जोरात सुरू असून वंचित बहुजन आघाडी कडून मराठवाडा उपाध्यक्ष प्रवीण रणबागुल हे विधानसभा निवडणूक लढविण्यास सज्ज झाले आहेत. तर मनसे ही आपला उमेदवार उभा करू शकतो.

गेल्या पाच वर्षात आमदार व पालकमंत्री म्हणून सावंत यांनी परंडा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकास कामे केली असल्याचे तानाजीराव सावंत यांनी मतदारसंघात गाव भेटी दौऱ्याच्या वेळी सांगत मोठ्या प्रमाणात विकास कामे केली आहेत, असे सांगितले जात आहे. तर मतदार संघासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याचे सांगत आहेत काही महत्त्वपूर्ण विकास कामे सुरू आहेत त्याचे लोकाअर्पण ही केल्याचे सांगितले जात आहे. त्याच बरोबर निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणुकीच्या अनुषंगाने तानाजीराव सावंत यांनी मतदारांच्या गाठीभेटी घेण्यासाठी गाव भेट दौरा करून प्रचारास जोरदार सुरुवात केली आहे.

महाविकास आघाडीचा उमेदवार कोण याची चर्चा सध्या परंडा मतदारसंघात जोरात रंगत असून माजी आमदार राहुल मोटे यांनीही भूम, वाशी तालुक्यात गाव गेट दौरे करून मतदाराच्या गाठीभेटी घेण्यास सुरुवात केली आहे. सध्या राहुल मोटे परंडा तालुक्यात मतदारांच्या गाठीभेटी घेत आहे. आपण आमदार असताना मतदार संघात मोठ्या प्रमाणात विकास केल्याचे मतदाराना पटवून देत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांच्या नावाची ही जोरदार चर्चा असुन पाटील यांना तिन्ही तालुक्यात मानणारा मतदार मोठ्या प्रमाणात आहे.

त्यांच्या ही काळात मतदार संघात मोठया प्रमाणात विकास कामे झाली होती असे म्हटले जात आहे.

### वंचितकडून बिगुल वाजले...

पैशावर निवडणुका जिंकता येत नाहीत जनतेच्या संपर्कात राहीले पाहिजे. वंचित बहुजन आघाडी कडून परंडा मतदारसंघात प्रवीण रणबागुल हे विधानसभा निवडणूक लढविण्यास इच्छुक असल्याने मतदारसंघात मोठी रंगत येणार आहे. रणबागुल यांनी भूम, वाशी तालुक्यातील प्रत्येक गावातील जनतेच्या गाव भेटी घेतल्या असून बऱ्याच शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात पावसामुळे नुकसान झाले होते. त्या शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन प्रत्यक्षात बागुल यांनी शेतकऱ्याची भेट घेऊन फुल ना फुलाची पाकळी म्हणून शेतकऱ्यांना सढळ हाताने थोडीशी आर्थिक मदत देण्याचा प्रयत्न केला असून प्रवीण बागुल सध्या परंडा तालुक्यात जनता जनार्दन मतदाराशी संपर्क साधत असून त्यांना यावेळी जनतेतून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचेही दिसून येत आहे.


# परंडा तालुक्यातील वीज पुरवठा वारंवार खंडीत; ग्रामस्थांत नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२५ सप्टेंबर -**

परंडा शहर व तालुक्यातील बहुतेक गावामध्ये वीज पुरवठा वारंवार खंडित होण्याचे प्रकार गेल्या अनेक दिवसांपासुन वाढल्यामुळे सुरू असल्याने तालुक्यातील जनतेमधील ग्रामस्थ नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

पावसाला सुरुवात होताच वीज पुरवठा खंडित होत असल्याने जेकटेवाडी व देवगांव (बु) गावामधील ग्राम स्थांमध्ये विद्युत महावितरण कंपनीबद्दल प्रचंड रोष निर्माण होत आहे.

तसेच कोणत्या ना कोणत्या भागामध्ये विजेचा फॉल्ट असल्याचे कारण पुढे करत वीज गायब होते. याचाच अर्थ संबधितीत अधिकाऱ्याचे वीजेच्या व्यवस्थेकडे साफ दुर्लक्ष होत असल्याचे दिसुन येते याचा सर्वाधिक फटका सर्व सामन्य नागरिकांना बसत आहे. वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे याचा त्रास हा विद्यार्थी, शेतकरी व व्यावसायिकांना सहन करावा लागत आहे.



त्यातच पावसाळा सुरु असल्याने डासांच्या प्रादुर्भावामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे जेकटेवाडी व देवगांव (बु) येथील नागरिकांनी विद्युत महवितरण कंपनीच्या भोंगळ कारभारावर नाराजी व्यक्त केली आहे. तसेच अधिकारी व कर्मचारी आपल्या नियुक्तीच्या ठिकाणी वास्तव्य करीत नसलेल्या वीज पुरवठा लवकर सुरू होत नाही.

तसेच दरमहा मीटरची रिडींग दि.१ ते ५ तारखेच्या घेऊन जाणे बंधनकारक असताना उशिरा रिडींग नेण्यात येते याचा फटका वीज धारकांना बसतो कारण १०० युनिटच्या पुढे वीजेचा वापर झाला तर दुप्पट वीज बिल आकारणी होते. शिवाय नियमित वीज बिलाचे वाटत करण्यात येत नाही.

तेव्हा वरिष्ठ अधिकारी यांनी याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी सर्वसामान्य वीज धारकांतुन होत आहे.

# देवी विजय ग्रंथ समाप्ती सोहळा सांगता



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ सप्टेंबर -**

कमान वेस विभागातील जय अंबिका मंडळ यांच्या वतीने रूढी परंपरे नुसार श्री तुळजाभवानी मातेचे महात्य असलेल्या श्री देवी विजयग्रंथ वाचन सांगता सोहळा संपन्न झाला.

त्यानिमित्त आई तुळजाभवानी मातेस सिंहासन पूजा करून अन्नदान करून श्री देवी ग्रंथ वाचन सोहळा समाप्ती करण्यात आली. शहरातील शुक्रवार पेठ, खडकाळ गल्ली, जवाहर गल्ली, कमान वेस भागात सर्व पुजारी बांधव मोठ्या प्रमाणात राहतात. या समाप्तीनिमित्त सिंहासन पूजा, अन्नदान करण्यात आले.

यासाठी मंडळाचे अध्यक्ष किरण लोंढे, नाना पेंदे, बाळासाहेब कदम, रमाकांत लोंढे, विक्रम कदम, श्रेणिक मुकेरकर, बर्वे, अजित काठेवाड, चिवचिवे, गणेश कदम, अमोल लोंढे हे सिंहासन पूजेसा उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना एसडीआरएफ, एनडीआरएफ अंतर्गत तातडीने मदत द्यावी : अनिल जगताप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ सप्टेंबर -**

अतिवृष्टी व सततच्या पावसाने झालेल्या नुकसानीपोटी धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना एसडीआरएफ व एनडीआरएफ अंतर्गत तातडीने मदत करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते तथा विमा अभ्यासक अनिल जगताप यांची मागणी केली आहे.


जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, गेल्या तीन चार दिवसापासून धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टी व सततचा पाऊस होऊन धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात पिकाचे व पशुधनाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे खूप मोठी आर्थिक झळ यावर्षी शेतकऱ्यांना सहन करावी लागणार आहे. धाराशिव जिल्ह्यातील व सततचा पाऊस झाल्याने शेत जमिनी खरवडून गेल्या असून, उभ्या पिकाचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी रस्ते व पूल खचले आहेत.



पुराच्या पाण्यात जनावरे वाहून गेली असून शेतात सोयाबीनची गंज लावताना वीज पडल्याने कळंब तालुक्यातील तालुक्यातील भाट शिरपुरा येथील एका तरुण शेतकऱ्यांचे प्राण गेले आहे. धाराशिव जिल्ह्यात आर्थिक व जीवित हानी खूप मोठ्या प्रमाणात झालेली आहे. शेती पिकाचे तर कधीही न भरून येणारे नुकसान झाल्याने शेतकरी हतबल झाला असून त्याला आर्थिक मदतीची गरज आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तालुका महसूल प्रशासनाला आदेश देऊन अतिवृष्टी व सततच्या पावसाच्या झालेल्या शेती पिकाच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. तसेच यापूर्वी संबंधितांना आदेश दिले असल्यास त्याची गती वाढवावी व तातडीने शासनाला प्रस्ताव सादर करून शेतकऱ्यांना एसडीआरएफ एनडीआरएफ अंतर्गत तातडीने मदत द्यावी.

येत्या १५ ते २० दिवसात महाराष्ट्रात विधानसभेची आचारसंहिता लागणार असल्याने पंचनामे तातडीने पूर्ण करून शासनाला प्रस्ताव पाठवावा व तातडीने बळीराजांना मदत करावी, अशी विनंती अनिल जगताप यांनी केली आहे.

# मांजरा धरण ओव्हर फ्लो, दोन दरवाजे उघडले



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ सप्टेंबर -**

बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्याला वरदान ठरलेले, धनेगाव येथील मांजरा धरण दि.२५ सप्टेंबर बुधवार रोजी दुपारी ओव्हर फ्लो झाले असून धरणाच्या दोन दरवाजातून १ हजार ७३० क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरु केला आहे.

धरण झाल्यापासून गेल्या ४४ वर्षाच्या काळात १७ व्यादा धरण भरले आहे. बीड जिल्ह्यातील केज, अंबेजोगाई, धारूर सह लातूर शहर, मुरुड, लातूर औद्योगिक वसाहती सह, कळंब आदी गावांना पाणी पुरवठा या धरणातून केला जातो.

तसेच बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यातील शेकडो एकर शेती या धरणामुळे बागायती झाली आहे.

गेल्या दोन वर्षानंतर पुन्हा एकदा धरण भरल्यानंतर शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# माकणी निम्न तेरणा प्रकल्पाचे सर्वच दरवाजे उघडले



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२५ सप्टेंबर -**

लोहारा तालुक्यातील माकणी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस पडला असल्यामुळे येणारा येवा लक्षात घेऊन पाणी पातळी नियंत्रित करण्याच्या दृष्टीने दि.२५ सप्टेंबर रोजी पहाटे ५.१५ वाजता निम्न तेरणा प्रकल्पाचे द्वार क्रं. ५,१०,४,११,३,१२,२ व १३ हे १० सेंटिमीटरनी वाढवुन तेरणा नदी पात्रात विसर्ग वाढविण्यात आला आहे. सध्य:स्थितीत द्वार क्रं.१ ते १४ (एकुण १४) हि वक्रद्वारे २० सेंटिमीटरनसेंटिमीटरने चालु असुन एकुण १०७०४ क्युसेक्स (३०३.१० क्युमेक्स) इतका विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला आहे. धरणामध्ये येणारी पाण्याची आवक पाहुन विसर्ग वाढविणे, कमी करणे निर्णय घेण्यात येईल. तरी नदीकाठच्या सर्व गावातील नागरिक व शेतकरी बांधवांनी दक्ष रहावे. नदीकडे जाऊ नये व आपली जनावरे व मालमत्ता आदी नदीकाठाहून दुर न्यावे. सदर बाबीकडे आ. चौगुले लक्ष ठेवून आहोत.

तरी कोणत्याही स्वरूपाची समस्या उद्धवल्यास नागरिकांनी त्वरीत आमच्याशी संपर्क साधावा, असे आवाहान उमरगा लोहारा तालुक्याचे आ. ज्ञानराज चौगुले यांनी केले आहे.

निम्न तेरणा धरणात पाण्याचा विसर्ग चालू असल्याने तहसीदार काशिनाथ पाटील यांनी धरणावर येऊन पाहणी करुन परिस्थितिवर लक्ष ठेऊन आहेत. निम्न तेरणा धरणाचे शाखा अभियंता के.आर. एनगे, हे सर्व कर्मचारी निम्न तेरणा धरणावर तळ ठोकून आहेत.

# बोरी धरण पाण्याने तुडूंब भरले; अनेक गावांचा प्रश्न मिटला

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२५ सप्टेंबर -**

सध्या पडत असलेल्या पावसामुळे नळदुर्ग येथील बोरी धरण पाण्याने तुडुंब भरले आहे. दि.२५ सप्टेंबर रोजी हे धरण पुर्ण भरल्याने धरणाचा सांडवा सुरु झाला आहे. धरण भरल्यामुळे धरणातील नवीन पाण्याचे जलपुजन नळदुर्ग शहर पत्रकार संघ व शहर शिवसेनेच्या वतीने करण्यात आले. धरण भरल्यामुळे नळदुर्ग शहरासह तीर्थक्षेत्र तुळजापुर व अणदुरसह इतर गावांच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे.

सध्या बोरी धरण पाणलोट क्षेत्रात चांगला पाऊस झाल्याने दि.२५ सप्टेंबर रोजी बोरी धरण पाण्याने तुडुंब भरले असुन धरणाचा सांडवा सुरु झाला आहे. सांडवा पुर्ण क्षमतेने सुरु झाला नसला तरी येत्या दोन दिवसात हा सांडवा पुर्ण क्षमतेने सुरु होऊन ऐतिहासिक नळदुर्ग किल्लूयातील नेत्रदीपक म्हणुन ओळखले जाणारे शिलक आणि नर-मादी धबधबा सुरु होण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी अतिशय कमी पाऊस झाल्यामुळे बोरी धरण भरले नव्हते त्यामुळे किल्लूयातील शिलक व नर-मादी धबधबा सुरु झाले नव्हते. त्यामुळे किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची घोर निराशा झाली होती मात्र यावर्षी बोरी धरण भरल्यामुळे हे धबधबे पुर्ण क्षमतेने प्रवाहीत होण्याच्या आशा उंचावल्या आहेत.

बोरी धरण भरल्यामुळे नळदुर्ग शहरासह तुळजापुर, अणदुर व इतर गावांच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे. त्याचबरोबर धरण क्षेत्रातील शेतीच्या सिंचनाचा प्रश्नही आता मिटला आहे. धरण क्षेत्रातील शेतकऱ्यांना आता कालव्याद्वारे रब्बी तसेच उन्हाळी पिकासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.



बोरी धरण भरल्यामुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले आहे. दि.२५ सप्टेंबर रोजी नळदुर्ग शहर पत्रकार संघ व शहर शिवसेनेच्या वतीने धरणातील पाण्याचे जलपुजन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव तसेच विलास येडगे यांच्या हस्ते जलपुजन करण्यात आले.

यावेळी शहर पत्रकार संघाचे सुहास येडगे, तानाजी जाधव, लतिफ शेख, शिवाजी नाईक, भगवंत सुरवसे, दादासाहेब बनसोडे, अजित चव्हाण, सुधीर हजारे, अमर भाळे आदिजन उपस्थित होते. शहर शिवसेनेच्या वतीने कमलाकर चव्हाण यांच्या हस्ते जलपुजन करण्यात आले. यावेळी सरदारसिंग ठाकुर, शहर प्रमुख संतोष पुदाले, उपशहरप्रमुख शाम कणकधर आदिजन उपस्थित होते.

## अग्रलेख...

# दूरदृष्टीचे निर्णय

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाने २३ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत आगामी निवडणुकांवर डोळा ठेवून अनेक निर्णय घेतल्याची टीका होण्याची शक्यता असली, तरी त्यातील अनेक निर्णय हे दूरदृष्टीचे आणि त्यामुळेच राज्याच्या व राज्यातील जनतेच्या भल्याचे आहेत. मंत्रिमंडळाची बैठक आणि त्यातील निर्णय हा तसा निरंतर चालणारा प्रकार आहे. कोणत्या तरी टप्प्यावर त्यातील औपचारिकतेचा भाग बाजूला ठेवून काही ठोस निर्णय घेणे गरजेचे असते. ती दूरदृष्टी महायुती सरकारने दाखविली. महायुती सरकारच्या कार्यकाळातील सर्वांत महत्त्वाचा निर्णय म्हणून ब्राह्मण समाजाच्या विकासासाठी भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या स्थापनेच्या निर्णयाकडे पाहिले पाहिजे. राजकीय, सामाजिक व आर्थिक फायद्यांसाठी सर्व समाज, समुदाय आपापले घोडे पुढे रेटत असताना अल्पसंख्यक असलेला ब्राह्मण समाज नेहमीच शांत असतो. या समाजाला कोणतीही सवलत नाही, आरक्षण नाही. इतर समाजांप्रमाणे ब्राह्मण समाजातही गरीब, दरिद्री लोक आहेत. त्यांना दिलासा देण्यात सरकारला अनेक अडचणी होत्या. त्या या निर्णयाद्वारे दूर झाल्या आहेत. मात्र, महामंडळाला पुरेसे आर्थिक व राजकीय पाठबळ देणे आणि त्याच्या माध्यमातून ब्राह्मण समाजातील गरजू व गरीब घटकांचे उत्थान साधणे हे आव्हानात्मक काम असून तेथे जाती-पातींच्या पारंपरिक चष्म्यातून न पाहता काम करणारे लोक असले पाहिजेत. महायुतीच्या मंत्रिमंडळाचा दुसरा महत्त्वाचा निर्णय म्हणजे सरपंच, उपसरपंच यांच्या मानधनात केलेली भरीव वाढ. सरपंच आणि उपसरपंचांचे मानधन आता दुप्पट होईल. ते पुरेसे आहे की नाही, हा वादाचा मुद्दा आहे. मात्र, त्यांना मिळणाऱ्या मानधनात सन्मानजनक वाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला, हेही नसे थोडके. महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण-२०२४ याच बैठकीत मंजूर झाले. २०१० सालातील सांस्कृतिक धोरणाचा फेरविचार केल्यावर हे नवे धोरण तयार करण्यात आले आहे. महाराष्ट्राची ओळख सशक्त सांस्कृतिक केंद्र म्हणून निर्माण करणे, महाराष्ट्राचा समृद्ध वारसा आणि कलेची जपणूक करून जागतिक पातळीवर राज्याचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करणे हा या धोरणामागील हेतू आहे. ऐतिहासिक स्थळे, कला संग्रहालये आणि साहित्य यासारख्या सांस्कृतिक संपत्तीचे संरक्षण आणि संवर्धन करणे, विविध प्रकारांच्या उपक्रमांमध्ये स्थानिक समुदाय आणि कलाकारांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे, सांस्कृतिक वारसा व परंपरांबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करून उपक्रम राबविणे, सांस्कृतिक कार्यक्रमांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी वित्तीय योजना तयार करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सांस्कृतिक वारसा आणि कला यांचे संरक्षण आणि संवर्धनासाठी उपाययोजना करणे, सांस्कृतिक धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संशोधन व विकासास प्रोत्साहन देणे, पायाभूत सांस्कृतिक सुविधा निर्माण करणे, सामाजिक एकता वाढीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे, सांस्कृतिक क्षेत्राची आर्थिक मूल्यवृद्धी धोरणे निश्चित करणे, सांस्कृतिक क्षेत्रातील पायाभूत सुविधा आणि वारसा संवर्धन यासाठी गुंतवणूक आकर्षित करणे अशी अनेक उद्दिष्टे या धोरणाच्या माध्यमातून निश्चित करण्यात आली आहेत. याशिवाय, पुण्याच्या लोहगाव विमानतळाला जगद्गुरू संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव देण्यासाठी केंद्राकडे शिफारस करणे, बालगृहे निरीक्षणगृहातील कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना व शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी, प्रतिक्विंटल ४० रुपये अतिरिक्त भरडाई दर देऊन धान उत्पादकांना दिलासा देणे, शिरूर ते छत्रपती संभाजीनगर या १४ हजार ८८६ कोटींच्या ग्रीन फिल्ड द्रुतगती मार्गास मंजुरी, करदात्यांचे हित लक्षात घेऊन जीएसटी अधिनियमात सुधारणा करणे, जळगाव आणि यवतमाळ जिल्ह्यातील सूत गिरण्यांना सहाय्य देणे, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी पदांचे एकत्रीकरण करून 'ग्रामपंचायत अधिकारी' पद निर्माण करणे, हरित हायड्रोजन धोरणात अँकर युनिटची पारदर्शकपणे निवड करण्याचा निर्णय, एसटी महामंडळाच्या जमिनी बीओटी तत्त्वावर विकसित करण्याचा निर्णय, राजपूत समाजासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथील विधि विद्यापीठांना सात कोटी रुपये देण्याचा निर्णय, गायीच्या दुधासाठी लिटरमागे उत्पादकांना सात रुपयांचे अनुदान, कुणबी समाजाच्या तीन जातींचा इतर मागासवर्ग यादीत समावेश करणे, सारथी, महाज्योतीच्या विद्यार्थ्यांना नोंदणीपासून संपूर्ण अधिछात्रवृत्ती देणे, अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्तीसाठी सहज पदे उपलब्ध होतील, यासाठी धोरणात सुधारणा करणे यासह इतर अनेक निर्णयही या बैठकीत घेतले गेले. या सर्व निर्णयांकडे राजकारणाच्या पलीकडे पाहिले तर त्यामागील कल्याणकारी भावना लक्षात येईल. सरकार चालविण्याची संधी राजकारणातूनच मिळते. त्यामुळे राजकीय नफा-तोटा लक्षात ठेवावाच लागतो. या नियमाला कोणत्याही पक्षाचे सरकार किंवा कोणताही पक्ष अपवाद असू शकत नाही. मात्र, काही निर्णय पक्षातीत आणि राजकीय फायद्या-तोट्याच्या पलीकडे विचार करून घ्यावे लागतात. ब्राह्मण समाजासाठी भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय हा त्यातीलच एक निर्णय आहे. महाराष्ट्रात ब्राह्मण समाजाकडे पाहण्याची एक विकृत दृष्टी गेली अनेक दशके अस्तित्वात आहे. या महामंडळाच्या निर्मितीच्या संदर्भातही त्या विकृतीला धरून टीका होऊ शकते. हा समाज कोणत्याही टीकाटिप्पणीचे उत्तर देत नाही. निषेधसुद्धा क्वचित करणारा हा समाज आहे. मात्र, एक प्रकारचे नैराश्य या समाजात आहे, हे नाकारता येत नाही. त्यावर काही ना काही फुंकर घालण्याचा मार्ग म्हणून भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले जात असेल तर त्याकडे समाजाच्या आणखी एका कमकुवत घटकाच्या उत्थानासाठी केला जात असलेला प्रयत्न म्हणून पाहिले पाहिजे. सरकारतर्फे एखादा निर्णय घेतला जातो तेव्हा त्यावर बरेच मंथन झालेले असते. त्या निर्णयाचे सामाजिक, राजकीय आणि विशेषतः आर्थिक परिणाम अग्रीमात विचारात घेतले जातात. महायुतीचे सरकार तीन पक्षांचे असले तरी त्यात अनुभवी लोक आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दीर्घ अनुभव आहे. उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे दोघेही अनुभवी आहेत. त्यामुळे राजकीय दृष्टिकोनातून घ्यावयाचे निर्णय आणि राज्याच्या हितासाठी घ्यावयाचे निर्णय यांच्यातील सीमारेषा कशी राखायची, हे या सर्वांना आणि मंत्रिमंडळातील त्यांच्या सहकाऱ्यांनादेखील कळते. सरपंच, उपसरपंच हा आपल्या बहुस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्था प्रणालीतील सर्वांत खालचा स्तर. गावाच्या पातळीवरचा. त्यांना आपल्या कामाचे समाधान मिळेल, अशा पद्धतीने मानधन दिले पाहिजे, असे राज्य सरकारला वाटले आणि त्यांनी तसा निर्णय घेतला, हे कौतुकास्पदच म्हटले पाहिजे. २३ सप्टेंबरच्या बैठकीतील अनेक निर्णय चांगले आहेत, कल्याणकारी आहेत. लोकशाहीत मतभेद असणे, ते व्यक्त होणे, टीका होणे यात काहीही वावगे नाही. सर्वांनी या निर्णयांचे स्वागत करावे, अशीही अपेक्षा करण्यात अर्थ नाही. मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर खेरीज त्यातील निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हायला बराच मोठा काळ लागत असतो. त्यापूर्वी विधिमंडळाच्या अधिवेशनांदरम्यान यातल्या अनेक विषयांवर चर्चा होईल. कुठेतरी सुरुवात करावी लागते. ती महायुती सरकारने या निर्णयांच्या माध्यमातून केली आहे. यानिमित्ताने काही अपेक्षा व्यक्त केल्या पाहिजेत. त्या अशा की, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रासाठी या सरकारने आता काही दिशादर्शक निर्णय घेतले पाहिजेत. तशी सुरुवात तरी करून ठेवली पाहिजे. समाजाच्या निकडीचे असे हे दोन विषय आहेत. या दोन्ही क्षेत्रांचा फायदा घेणारे लोक प्रत्येक घरी आहेत. शिक्षण क्षेत्राची अवस्था चांगली नाही. सरकारी शाळांमध्ये विद्यार्थी नाहीत. ते असले तर मास्तर नाहीत. खाजगी शाळा, कोचिंग क्लासेसचे स्तोम माजलेले आहे. सरकारी दवाखान्यांची स्थिती वाईट आहे. ग्रामीण भागात तर सरकारी शाळा आणि दवाखाने यांचा एकुणात आनंदच आहे. त्यांच्यासाठी काही क्रांतिकारी निर्णय आता या सरकारने घेतले पाहिजेत; जेणेकरून भविष्यात ही क्षेत्रे दुरुस्त होतील आणि लोकांकडून वसूल केलेल्या करातून दिल्या जाणाऱ्या सोयींचा अधिकाधिक लोकसंख्येला लाभ होऊ शकेल. ▮

## चिंतन

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

# चला स्व-गणना करू!

ई-मार्केट, ई-ॲप्लिकेशन, रेल्वे आणि बसमध्ये आरक्षण आणि ई-पेमेंटनंतर आता ई-सेन्सेस अर्थात जनगणनेचीही देशात सुरुवात होणार आहे. यामध्ये जन्म आणि मृत्यू दोन्ही डिजिटल जनगणनेशी जोडले जातील. डिजिटल जनगणना प्रत्येक जन्मानंतर आपोआप अद्ययावत केली जाईल आणि जेव्हा एखाद्याचा मृत्यू होईल तेव्हा त्याचे नाव डेटामधून आपोआप हटवले जाईल. बालकाचा जन्म, आई-वडील, जात आणि जन्म ठिकाण यासह ३१ प्रश्नांची उत्तरे जनगणना नोंदवहीत नोंदवली जातील. मूल १८ वर्षांचे झाल्यावर त्याचे नाव आपोआप निवडणूक आयोगाकडे जाईल. त्यामुळे त्याचे मतदार ओळखपत्र बनविण्यासोबतच त्याचे नाव मतदार यादीत आपोआप नोंदले जाईल. अशाप्रकारे जनगणना डेटा नेहमी आपोआप अद्ययावत केला जाईल.

राष्ट्रीय लोकसंख्या निबंधक (एनपीआर) प्रक्रियेसाठी सुमारे १२ हजार कोटी रुपये खर्च येणार आहे. १ फेब्रुवारी २०२१ रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी डिजिटल जनगणनेची घोषणा केली होती. जनगणना-२०२१ मध्ये, नागरिकांना जनगणनेमध्ये सहभागी होण्यासाठी एक चांगली आणि अनोखी ऑनलाईन सुविधा देण्यात आली आहे. जनगणना (सुधारणा)-२०२२ नुसार, पारंपरिकपणे सरकारी कर्मचारी घरोघरी जाऊन जनगणना करतीलच; परंतु आता नागरिकही स्व-गणनेद्वारे माहिती भरू शकतात. यासाठी पूर्वीच्या नियमांमध्ये 'इलेक्ट्रॉनिक फॉर्म' हा शब्द जोडण्यात आला आहे. या अंतर्गत तयार केलेली, पाठवलेली किंवा माध्यमात साठवलेली माहिती, चुंबकीय, संगणकाद्वारे तयार केलेली मायक्रोचिप किंवा इतर तत्सम उपकरण इलेक्ट्रॉनिक स्वरूपात दिलेली माहिती मानली जाईल. म्हणजेच तुमची नोंदणी ॲण्ड्रॉईड मोबाईलवरूनही केली जाऊ शकते. लक्षात ठेवा, ही जनगणना २०२१ मध्ये होणार होती, परंतु कोरोना महामारीमुळे ते शक्य झाले नाही. आता ही ऑनलाईन मोजणी पुढे नेण्यासाठी पुढाकार घेतला जात आहे; जेणेकरून भारतीय नागरिकांची मोजणी लवकर करता येईल. जर हा प्रयोग यशस्वी झाला तर २०३१ ची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन होण्याची शक्यता आहे. ऑनलाईन वापर अद्वितीय आहे, यात शंका नाही. परंतु देशातील जनतेची कायमस्वरूपी आणि सतत गतिमान नोंदणी पाहता आता जनगणनेची जबाबदारी ग्रामपंचायत स्तरावर सोपविणे गरजेचे आहे.

गणनेच्या विकेंद्रीकरणाची ही कल्पकता १० वर्षीय जनगणनेच्या जटिल परंपरेपासून मुक्त करेल. त्याचवेळी देशाला प्रत्येक महिन्याला प्रत्येक पंचायत स्तरावरून जीवन आणि मृत्यूच्या मोजणीची अचूक आणि विश्वासार्ह आकडेवारी मिळत राहील. जनगणनेच्या या पद्धतीचा अवलंब करणेदेखील आवश्यक आहे. कारण वेगवान यांत्रिक आणि संगणकीकृत जीवनात, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक बदल घडवून आणण्यासाठी लोकसंख्येच्या सर्वमान्य आकार आणि संरचनेसाठी १० वर्षे वाट पाहू शकत नाही? भारतीय समाजात होत असलेल्या जलद लिंग, रोजगार आणि राहणीमानातील बदलांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करायचा असेल तर आपण जनगणना परंपरेत आमूलाग्र बदल घडवून आणणे आवश्यक आहे. जर लोकसंख्येच्या आकार, लिंग आणि वयानुसार त्याच्या जटिल रचनेची माहिती नसेल, तर सामान्यत: अर्थव्यवस्थेच्या विकासात कालांतराने प्रगती, उत्पन्नात वाढ, अन्नपदार्थांची उपलब्धता आणि पिण्याचे पाणी, घरे, वाहतूक, दळणवळण, रोजगार संसाधने, शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षा उपायांमध्ये पुरेशा वाढीचा अंदाज लावणे कठीण आहे. लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणात सीमांकनाद्वारे लोकसभा आणि विधानसभेच्या जागा वाढवल्या जातात. जनगणनेतील सातत्यही महत्त्वाचे आहे. कारण देश आणि जगामध्ये लोकसंख्या वाढ स्फोटक असल्याचे म्हटले जाते. पृथ्वीवरील मानवी समुदायांची लोकसंख्या १९ व्या शतकात इतकी झपाट्याने वाढली आहे की, ती यापूर्वी कधीही नोंदली गेली नव्हती. लोकसंख्या वाढीचा अंदाज घेणाऱ्या तज्ज्ञांच्या मते भारतातील लोकसंख्या दरवर्षी १ कोटी ६० लाखांनी वाढते. या दरानुसार, आपल्याला आपल्या देशातील सुमारे १ अब्ज ४० कोटी लोकसंख्येची एका निश्चित स्वरूपात मोजणी करावी लागेल; जेणेकरून लोक आणि संसाधनांच्या संख्येच्या बरोबरीने आर्थिक आणि रोजगाराभिमुख विकासाची ब्लू प्रिंट तयार करता येईल. वैज्ञानिक पद्धतीने केलेल्या अचूक जनगणनेचा हा आकडा म्हणजे अज्ञात भविष्यातील विकासाच्या परीक्षेवर पात्र ठरण्यासाठी केलेला एक प्रामाणिक प्रयत्न आहे. दर १० वर्षांनी होणाऱ्या जनगणनेत सुमारे २० लाख कर्मचारी सहभागी होतात. सहा लाख गावे, पाच हजार शहरे, शेकडो शहरे आणि डझनभर महानगरांतील रहिवाशांचे घरोघरी जाऊन जनगणना करणे कर्मचाऱ्यांना अवघड आहे. कर्मचाऱ्यांची एक टीम त्यांच्या स्थानिक दैनंदिन कामातून काढून दूरच्या गावात पाठवल्यास हे काम अधिक बोजड बनते. अशा परिस्थितीत, मोजणीच्या घाईत, ते मानवी समूह सोडले जातात जे उपजीविकेसाठी त्यांच्या मूळ निवासस्थानापासून स्थलांतर करतात. त्यामुळे जनगणना प्रक्रियेचे सध्याचे स्वरूप असे बदलणे आवश्यक आहे की, तिच्या मोजणीत सातत्य राहील. केवळ मोजणीची केंद्रिकृत जटिल प्रणाली विकेंद्रित करून सोपी करावी लागेल.

मोजणीची ही पद्धत वरपासून सुरू होणार नाही तर तळापासून सुरू होईल. ग्रामपंचायत देशातील सर्वात छोटे राजकीय आणि प्रशासकीय एकक आहे. आपल्याला फक्त पंचायत कार्यालयात लोकसंख्येची नोंद तीन प्रतींमध्ये ठेवायची आहे. या नोंदवहीची प्रत संगणकात साठवलेल्या लोकसंख्येच्या नमुन्यातदेखील टाकली पाहिजे. कुटुंबाचा एक घटक म्हणून विचार करून सरपंच, सचिव आणि पटवारी यांना या नोंदींमध्ये कुटुंबातील प्रत्येक सदस्याचे नाव आणि इतर माहिती लोकसंख्येच्या नमुन्यानुसार टाकण्याची जबाबदारी देण्यात यावी. गावात कोणत्याही मुलाचा जन्म झाला किंवा कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झाल्याची माहिती लगेचच गावभर पसरते, त्यामुळे विनाविलंब नोंदवहीमध्ये ही माहिती नोंदविता येते. ग्रामपंचायतीमध्ये संकलित केलेली ही माहिती दर महिन्याच्या ठरावीक तारखेला विकास गट स्तरावर पाठविण्यात यावी आणि रजिस्टरची प्रत विकास गट कार्यालयात ठेवावी. सर्व विकास गटांची ही माहिती जिल्हास्तरावर मागविण्यात यावी व त्याचे एकत्रीकरण केल्यानंतर ही मोजणी संगणकात नोंदविण्यात यावी. अशाप्रकारे सर्व विकास गटांची आकडेवारी मोजून दर महिन्याला जिल्ह्याची जनगणना केली जाणार आहे. देशाच्या राजधानीतील लोकसंख्या कार्यालयात राज्यस्तरावर जिल्हानिहाय जनगणनेची आकडेवारी आणि राज्याच्या लोकसंख्येची आकडेवारी संग्रहित केल्यास, देशाच्या जनगणनेची वैज्ञानिक आणि अस्सल आकडेवारी दर महिन्याला उपलब्ध होईल. शहरांमध्ये प्रभागनिहाय जनगणनेसाठी वरील मोजणी पद्धतीचा अवलंब करावा. या मोजणीत जी पारदर्शकता आणि अचूकता येईल, ती अन्य कोणत्याही पद्धतीने शक्य नाही. ▮


९९८७७४६७७६

## वेध

**गिरीश शेरेकर**

# रेल्वेवर जिहादी घातपाताचे संकट

ब्रिटिश काळात उदयास आलेली भारतीय रेल्वे देशभरातील सामान्य नागरिकांचे आज प्रवासाचे मुख्य साधन आहे. विस्तीर्ण भूभागावर वसलेल्या भारतात स्वातंत्र्यानंतर रेल्वेचे जाळे खऱ्या अर्थाने विणायला सुरुवात झाली. जशी लोकसंख्या वाढली, त्या आवश्यकतेनुसार रेल्वेचा विस्तार सातत्याने होत आला आहे. सामान्य जनतेला माफक दरात आरामदायी प्रवास करता यावा, यासाठी रेल्वेचे निरंतर प्रयत्न सुरू आहेत. वेगवेगळ्या सुविधा प्रवाशांना देण्यात येत आहेत. केंद्र शासनाने गेल्या १० वर्षांपासून रेल्वेचे अत्याधुनिकीकरण सुरू केले आहे. वंदे भारत नावाने अत्याधुनिक रेल्वे गाड्या प्रवाशांच्या सेवेत दाखल होत आहेत. आतापर्यंत लांब पल्ल्याच्या ५४ वंदे भारत रेल्वे सुरू झाल्या असून त्यापैकी ११ गाड्या महाराष्ट्राला देण्यात आल्या आहेत. आता तर वंदे भारत मेट्रो सुरू करण्यात आली आहे. रेल्वे स्थानके सोयी-सुविधांनी सुसज्ज होत आहेत. देशाची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणारी भारतीय रेल्वे जगात चौथ्या क्रमांकावर आहे. व्यवस्था कोणती असो, त्यात अडचणी येतातच. रेल्वे त्याला अपवाद नाही. रेल्वेचे अपघात नेहमीच चिंतेचा विषय राहिला आहे. अनेक अपघात आजपर्यंत झाले. बहुतांश अपघात तांत्रिक व मानवी चुकीमुळे झाले आहेत. या अपघातांवर नियंत्रण मिळविण्यासाठी वेगवेगळे उपाय करण्यात आले. आता रेल्वेने कवच प्रणाली विकसित केली आहे. २०२७-२८ पर्यंत ३४ हजार किमी रेल्वे मार्गावर ही प्रणाली कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. एकीकडे रेल्वे सक्षम होत असून दुसरीकडे जाणीवपूर्वक रेल्वेचे अपघात घडविण्याचे प्रयत्न होत आहेत. जिहादी मानसिकता जोपासणाऱ्यांचे हे कृत्य असल्याचे समोर येत आहे. अलिकडच्या काळात अनेक राज्यांत रेल्वे रुळांवर लोखंडी रॉड, बोल्डर, सिलेंडर इत्यादी काही वस्तू ठेवून घातपाताचे प्रयत्न उजेडात आले आहेत. या महिन्यातल्या उत्तरप्रदेशच्या दोन घटनांसह गेल्या दोन महिन्यांत रेल्वेचा घातपात करण्याचे २० पेक्षा



जास्त प्रयत्न समोर आले आहेत. त्यामागे दहशतवाद्यांचा हात असण्याची शक्यता वर्तविली जात असतानाच केंद्र सरकारने त्याबाबत कठोर पावले उचलली आहेत. ताज्या घटनांचा तपास पोलिस, गुप्तचर यंत्रणेव्यतिरिक्त एनआयएदेखील करीत आहे. तपासातून मिळालेल्या माहितीनंतर रेल्वेने सतर्कता वाढवली आहे. गुप्तचर विभागाला इशारा दिला आहे. भारताला अस्थिर करण्याचे प्रयत्न निष्फळ ठरत असल्याने हे नवे षडयंत्र रचले जात आहे. भारतविरोधी बाह्य व अंतर्गत शक्ती या घातपातामागे आहे. हे डाव उधळले जात असले तरी मोठ्या दुर्घटना घडण्याच्या पूर्वी अशा विघातक शक्ती शोधून ठेचणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

रेल्वे घातपाताचा कट देशद्रोहाच्या गुन्ह्यांतर्गत आणण्याची तयारी सरकार करीत आहे. त्यासाठी रेल्वे अधिनियमात दुरुस्ती केली जाणार आहे. याविषयीची अधिसूचना लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. विद्यमान स्थितीत रेल्वे अधिनियम-१९८९ च्या कलम १५१ अंतर्गत रेल्वे दुर्घटनेचा कट सिद्ध झाल्यास कमाल १० वर्षांची शिक्षा व दंडाची तरतूद आहे. आता या अधिनियमात उपकलम जोडून त्यास देशद्रोहाच्या श्रेणीत आणले जाईल. रुळावर अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न हा कट आहे. यातून दुर्घटना घडल्यास प्राणहानी होते. अशा आरोपीच्या विरोधात सामूहिक हत्येचे कलम लावण्याचा विचार होत आहे. त्यात जन्मठेपेपासून मृत्युदंडापर्यंतची तरतूद असू शकते. त्यावरून कायदेशीर सल्ला घेतला जात आहे. घातपात थांबविण्यासाठी निवडक प्रवासी गाड्यांना संवेदनशील भागातून पाठविण्याआधी पायलट लोको चालवली जाणार आहे. सोबतच रेल्वे रुळावर पोलिस, गँगमनचे निरीक्षण वाढविण्यावर जोर दिला जात आहे. संवेदनशील भागात रेल्वे प्रशासन कॅमेरे लावणार आहे. रेल्वे इंजिनावर कॅमेरे लावण्याची योजना आहे. यातून चांगली निगराणी होईल आणि घातपाताचे प्रयत्न आधीच रोखता येतील, असे सांगितले जात आहे. केंद्र सरकार योग्य दिशेने प्रामाणिक काम करीत आहे. फक्त हे उपाय तातडीने करून अंमलबजावणी व्हावी आणि रेल्वेवर घोंगावणारे संकट दूर करावे, अशी माफक अपेक्षा जनतेला आहे. ▮

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# पितृपक्षाचे शास्त्र!

हिंदू संस्कृती ही जगातील एकमेव संस्कृती आहे, ज्यात शाश्वत सिद्धांत आहेत. म्हणूनच अनादिकाळापासून आजतागायत ती टिकून आहे. आपल्या संस्कृतीत मोक्ष, मुक्ती, पुनर्जन्म, चौऱ्यांशीचा फेरा, इहलोक, स्वर्ग, पाप-पुण्य, नैतिकता अशा बाबींचा शाश्वत विचार केला आहे. 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव' हा विचार आपल्या रक्तात भिनलेला आहे. म्हणूनच जिवंत असताना तर आई-वडील-गुरू यांची सेवा भारतीय माणूस करतोच; पण त्यांच्या मृत्युपश्चातही त्यांना मुक्ती मिळावी म्हणून श्राद्ध, तर्पण, पिंडदानादी क्रिया हिंदू संस्कृतीत दृढ श्रद्धेने केल्या जातात. इतर संस्कृतीत ही श्रद्धा नाही. आई-वडील-सगेसोयरेच नाही तर प्राणिमात्रांचीदेखील केवळ जिवंतपणीच सेवा नाही तर मेल्यावरही त्यांच्या मुक्तीसाठी धडपड हे फक्त इथेच भारतात आहे.

आपल्या धर्मात मृत्युपश्चातचाही विचार केला आहे. आपली पहिली इच्छा मोक्ष किंवा मुक्ती आहे. हे नाही तर मनुष्ययोनीत आणि तेही भारतातच पुनर्जन्म व्हावा. चौऱ्यांशीचा फेरा शक्यतो नकोच ही आपली सततची इच्छा असते. यासाठी आयुष्यभर पुण्याईसाठी आपला प्रयत्न असतो. मृत्यूनंतरही सद्गतीसाठी इथे व्यवस्था आहेत. यातलाच महत्त्वाचा भाग म्हणजे पितृपक्ष.

भाद्रपद महिन्याचा कृष्णपक्ष म्हणजे पितृपक्ष. या १५ दिवसांना शास्त्रात 'महालय' म्हणतात. हा विशेष कालावधी असून तो अत्यंत पवित्र कालावधी आहे. पितरांना सद्गती देणारा हा कालावधी असून तो निषिद्ध अजिबात नाही.

**कधी झाली सुरुवात?** : पितृपक्ष अनादिकाळापासून आहे. या महालयाचा उल्लेख वेद, उपनिषद, पुराण, रामायण आणि महाभारतातही आहे. आपल्या पितरांना मोक्ष मिळावा, मुक्ती मिळावी, सद्गती मिळावी, शांती मिळावी म्हणून पक्षपंधरवड्यात पितरांचे आवाहन करून त्यांना पाचारण करतात. या पितृपक्षात ते भूलोकात आपल्या घरी येतात, हा आपला विश्वास आहे. पिंडदान श्राद्ध, तर्पण, क्षमादान, अर्घ्यदान, अग्नौकरण, विकीरदान, स्वधावाचन करून त्यांना भोजनाने तृप्त केले जाते. ते तृप्त होऊन उत्तमलोकात परत जातात. ही आपली नितांत श्रद्धा आहे.

ज्या तिथीला आपले वडील मृत्यू पावले; पितृपक्षातील त्याच तिथीला पिंडदान केले जाते. जर तिथीबद्दल संभ्रम असेल किंवा काही अपरिहार्यतेमुळे नियोजित तिथीला पिंडदान होऊ शकले नाही तर सर्वपितृ अमावास्येला पिंडदान करून पितरांचे भोजन करतात.

जर आपली आई किंवा घरातील स्त्री सौभाग्यवती गेली असेल तर चालू वर्षात पितृपक्षात नवमी तिथीला ज्या तिथीला 'आईनवमी' किंवा 'अविधवा नवमी' म्हणतात. या नवमीला पिंडदान तर्पण केले जाते. याच पितृपक्षात चतुर्थी किंवा पंचमीला भरणी नक्षत्र असते. म्हणून या दिवशीच्या श्राद्धाला भरणी श्राद्ध करतात. ज्यांना कोणाला गया, त्र्यंबक, ब्रह्मकपाल अशा पवित्र ठिकाणी जाऊन पिंडदान श्राद्ध करण्याची इच्छा असते; पण त्यांना ते शक्य होत नाही, त्यांनी भरणी श्राद्ध करावे. हे श्राद्ध गयादी तीर्थश्राद्धाचे फळ देते.

चालू वर्षात कोणी अविवाहित पुरुष गेला असेल तर चतुर्थी किंवा पंचमीला भरणी श्राद्ध केले जाते. वर्षश्राद्ध झाल्याशिवाय भरणी श्राद्ध करू नये. कारण एक वर्षपर्यंत तो जीव प्रेतयोनीतून पितृयोनीत जात नाही. म्हणूनच वर्षभर दर महिन्याला मासिक श्राद्ध सांगितले आहे. पितृपक्षाचे शास्त्र समजून घेतले पाहिजे. आपल्या शास्त्रात आपले चार प्रकारांचे देह सांगितले आहेत. स्थूलदेह, सुक्ष्मदेह, कारणदेह आणि महाकारण देह. यातील स्थूलदेह म्हणजे जो आपल्याला दिसतो, ज्याची आपण काळजी घेतो ते आपले शरीर. हा देह पंचमहाभूतांचा किंवा पंचतत्त्वांचा बनलेला असतो. माणूस मृत पावतो म्हणजे त्याचा अंत्यसंस्कार केला जातो. म्हणजे हा स्थूलदेह पंचतत्त्वात विलीन होतो. हा देह संपला तरी सुक्ष्मदेह इथेच असतो. स्थूलदेहाची अंत्यसंस्काराने सोय झाली, पण सुक्ष्मदेहालाही अवयव असतात. श्राद्ध प्रयोगात त्या सर्व अवयवांचा उल्लेख असतो. विशेष म्हणजे हा सुक्ष्मदेह कावळ्याला दिसतो. पक्षितज्ज्ञ मारुती चितमपल्ली यांनी त्यांच्या पुस्तकात आणि साहित्य संमेलनात अध्यक्षीय भाषणात स्पष्टपणे सांगितले आहे. म्हणून पितृपक्षात सुक्ष्मदेहाकरिता श्राद्ध विधी आहे. मनुष्य मृत झाला की तो मनुष्ययोनी सोडून प्रेतयोनीत जातो. स्थूलदेह त्याग आणि सुक्ष्मदेह धारण हा पहिला टप्पा. 'प्रेतलोक गमनार्थम्' श्राद्धकर्म असते. या सुक्ष्मदेहाची तृप्ती झाली की, हा देह पितृलोकात ज्याला शास्त्रात 'यमलोक' म्हणतात, तेथे जातो. हा कालावधी एक वर्षाचा असतो. वर्षश्राद्धानंतर सुक्ष्मदेहाची व्यवस्था होते. तेव्हा उरतो कारणदेह. कारणदेह पितृपक्षात आपल्याकडे येत असतो. हा कारणदेह तृप्त होतो तेव्हा त्यांना उत्तमलोक प्राप्त होतो. त्यानंतर तृप्त होऊन कारणदेहाची व्यवस्था होते. आता उरला महाकारणदेह. हा महाकारणदेह पितृपक्षात पिंडदान आणि श्राद्ध यामुळे मुक्त होऊन तो उत्तमलोकांतून कैलासलोक, वैकुंठलोक ज्याला शास्त्रात मोक्ष, मुक्ती म्हणतात, तिथे स्थिरावतो. यालाच 'सद्गती' म्हणतात. भूलोकातून प्रेतलोकात, प्रेतलोकातून उत्तमलोकात आणि उत्तमलोकातून वैकुंठ अर्थात सद्गती. स्थूलदेह सुक्ष्मदेहात, सुक्ष्मदेह कारणदेहात, कारणदेह महाकारणदेहात आणि शेवटी महाकारणदेह नारायण स्वरूपात विलीन होतो. म्हणजे पिंड ब्रह्मांडात विलीन होते. असा हा प्रवास पिंडदानाने सुकर होतो. म्हणून पितृपक्ष महत्त्वाचा. पिंडदानातील पिंड हा भात, तीळ आणि मध किंवा तुपाचा बनवतात; त्याला 'चरूपिंड' म्हणतात. श्राद्धादी प्रयोगात पिंड जर कणकेचा बनला असेल तर त्याला 'सत्तूपिंड' म्हणतात. हे पिंड म्हणजे पितरांचे शरीर आहे. दर्भासनावर बसवून त्याचेच पूजन आपण करतो. पिंडाला नमस्कार करतो. पिंडदान करताना तीन तीन पिंडांच्या तती मांडतात. पिता, पितामह आणि प्रपितामह म्हणजे वडील, आजोबा आणि पणजोबा यांच्यासाठी ती असतात. तीन पिंडांची रांग ही प्रातिनिधिक असते. या क्रियेत आईवडील, पूर्वज, सगेसोयरे यांचीही तृप्ती केली जाते. आपल्या गुरूंनाही तृप्त करण्याचा विधी यात आहे. इतकेच नाही, तर प्राणिमात्रांचे पिंडदान आपल्या संस्कृतीत आहे. भगवान रामचंद्रांनी पक्षिराज जटायूचे तर ज्ञानेश्वर माउलींनी आळे फाट्यावर रेड्याचे पिंडदान केल्याचे सर्वश्रुत आहे.

'तत्र देवो सहाय्यकृत' हा आपला विश्वास आहे. त्यांची तृप्ती आपल्या घरातील अवदसा आणि अवकळा घालवते. पितृपक्षात पितराना तृप्त केल्याने घरातील नकारात्मकता नष्ट होऊन घरात निरामय वातावरण निर्माण होते. या पितृपक्षात गया, हरिद्वार, त्र्यंबक, बद्रीनाथ आणि उज्जैन क्षेत्री श्राद्ध, तर्पण, पिंडदान फलदायी असते. या शिवाय ब्रह्मकपाल येथे जिवंतपणी स्वत:चे श्राद्ध स्वत: करण्याची परंपरा आहे. स्वश्राद्ध इतर स्थानीही करता येते. या सर्व तीर्थात गया क्षेत्र अग्रस्थानी आहे. 'श्राद्धारंभे गयायां ध्यात्वा, ध्यात्वा देव गदाधरं-' भाद्रपदातील पौर्णिमा आणि कृष्णपक्ष मिळून सोळा दिवस होतात. हा महालय म्हणून प्रसिद्ध आहे. महालय म्हणजे सर्वात मोठे घर अर्थात वैकुंठस्थान. पितृपक्षात पितरांना अन्न आणि अक्षय्यतृतीयेला घडाभरून पाणी दिल्यास त्यांना सद्गती तर मिळतेच; आपल्याही जीवनात सुख-शांती-समाधान कायम निवासी राहते. पितृपक्ष हा पितरांना सद्गती देणारा पवित्र पंधरवडा आहे. अतीव विश्वासाने भारतात श्राद्ध, तर्पण, पिंडदान केले जाते. ते निश्चित फलदायी आहे. पितृपक्ष ही पुण्य कमावण्याची सर्वात मोठी संधी आहे. ▮

९८२२२६२७३५

## हे तर महापाप

आंध्रप्रदेशातील जगप्रसिद्ध तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसादाच्या लाडवांमध्ये प्राण्यांच्या चरबीचा वापर झाल्याची



माहिती मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी दिली. या लाडूच्या प्रयोगशाळेतील परीक्षणाचा अहवाल तेलगू देसम पक्षाने उघड केला आहे. अहवालानुसार या लाडवांमध्ये माशांचे तेल, बीफ टॅलो म्हणजे गोमांसाच्या चरबीपासून बनवलेला एक पदार्थ आणि डुकराची चरबी यांचा वापर केल्याचे निदर्शनास आले आहे. तिरुपती मंदिराच्या ३०० वर्षे जुन्या असलेल्या स्वयंपाकघरात दररोज २०० ब्राह्मण जवळजवळ साडेतीन लाख लाडू बनवतात. हे लाडू बनवताना शुद्ध बेसन, बुंदी, साखर, काजू आणि शुद्ध तूप यांचा वापर केला जातो. असे असतानाही माशांचे तेल, बीफ टॅलो आणि डुकराची चरबी असलेले लाडू भक्तांना प्रसाद म्हणून दिले जात आहेत. लाखो भक्त मोठ्या श्रद्धेने तिरुपती मंदिरात दर्शनाला येत असतात. जाताना ते प्रसाद म्हणून स्वतःसाठी आणि इतरांसाठीही लाडू घेऊन जात असतात. असे भेसळीचे लाडू प्रसाद म्हणून देणे हा भक्तांनी दाखवलेल्या श्रद्धेला मोठा तडाच आहे आणि हे खूप मोठे महापाप आहे. हा प्रसाद नाही तर एकप्रकारचे विषच आहे. या अक्षम्य अपराधाला देवदेखील क्षमा करणार नाही.

**भीमराव साळुंखे**/९४२३८६५९५०

●● ●●

## श्राद्धाचा उल्लेख महाभारतात

एकूण अठरा दिवस सुरू असलेले महाभारत युद्ध जेव्हा समाप्त झाले तेव्हा कौरव आणि पांडव या दोन्ही पक्षांतील हजारो सैनिकांचा वध झाला. हे सर्व पाहून भगवान श्रीकृष्ण सम्राट युधिष्ठिर यांना उपदेश करतात की, हे युधिष्ठिरा युद्धामध्ये वध झालेले हे सर्व सैनिक तुझ्या बाजूने कौरवांशी लढताना मृत्युमुखी पडले आहेत. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांना पुढची गती मिळावी यासाठी युद्धात मृत्युमुखी पडलेल्या सर्व सैनिकांचे तू श्राद्ध करावे. श्रीकृष्णाने असे सांगताच सम्राट युधिष्ठिराने श्रीकृष्णाच्या आज्ञेचे तत्परतेने आज्ञापालन करून युद्धामध्ये मृत्यू पावलेल्या सर्व सैनिकांचे श्राद्ध केले. याचाच अर्थ असा की, महाभारत काळापासून श्राद्धविधी करण्यास अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**दीपाली गीते**/९८२२००४०५४

●● ●●

## वाचक पत्रे

## मुलांची अती चिंता नको

'माझ्या पाल्याचे कसे होईल?' अशा प्रकारची चिंता किंवा भीती आजच्या या स्पर्धेच्या युगात सर्वच पालकांना सतावत असते. सगळ्याच क्षेत्रात म्हणजे अगदी लहान गटात प्रवेश मिळण्यापासून ते शिक्षण घेऊन नोकरी, व्यवसाय, उद्योग करेपर्यंतच्या प्रवासात वाढलेली प्रचंड स्पर्धा. यात आपला पाल्य कुठे टिकेल का? तो यशस्वी होईल का? त्याचे काय होईल? अशी चिंता न करता आपल्या पाल्याला सक्षम करण्यासाठी आपण काय करू शकतो, यावर विचारमंथन होणे गरजेचे आहे. प्रत्येकाला जन्मतःच काही ना काही नैसर्गिक शक्ती, सामर्थ्य व कौशल्ये उपजत मिळालेली असते. त्याच्या जोरावर व्यक्ती पुढील आयुष्यात कष्ट, सराव सातत्याने करण्याचा प्रयत्न करीत असल्याने यशस्वी होतो. जर तुमच्या पाल्याला आयुष्यात चांगले करीअर घडवायचे असेल तर त्याला पूरक वातावरण देणे, हे पालक म्हणून तुमच्या हातात आहे. अभ्यासाची मेहनत करणं त्याचं काम आहे. त्याची आवड आणि कल पाहून शिक्षणाची दिशा ठरवा. त्याच्या आवडीच्या क्षेत्रात जाण्यासाठी त्याला प्रेरित करा. त्याला प्रोत्साहन द्या. त्याचे मनोबल वाढवा. पालक म्हणून प्रत्येक यशापयशाच्या वेळी त्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहा. त्याला विश्वास द्या. एक दिवस तुमचा पाल्य नक्कीच या जगात चमकलेला असेल आणि तोही स्वतःच्या कर्तृत्वावर. यासाठी खालील बाबींकडे लक्ष द्या- आपल्या पाल्याला सर्वप्रथम माणसं ओळखायला शिकवा. पाल्याची शैक्षणिक प्रगती, व्यक्तिमत्त्व विकास याबरोबर व्यावहारिक ज्ञान, कौशल्य कसे वाढेल याकडे लक्ष द्या. मुलांना सतत सांगणे, ऐकवणे यापेक्षा प्रत्यक्ष अनुभव देण्याचा प्रयत्न करा. मुलांना मानसिकदृष्ट्या कणखर आणि सक्षम बनवा. परिस्थिती कितीही बिकट असेल तरी स्थिर राहायला शिकवा. मोठ्यांचा आदर करण्याबरोबरच माणसे जोडण्याची कला शिकवा. हाती घेतलेले कोणतेही काम मनापासून आणि आवडीने करण्याची सवय लावा. मानापमानाचे प्रसंग पचविण्याची क्षमता निर्माण करा. ते एक उत्तम जीवन शिक्षण आहे. अनावश्यक गोष्टीत वेळ वाया घालविण्यापेक्षा स्वतःला समृद्ध करणाऱ्या गोष्टीत रस घ्यायला शिकवा. संयमाने वेगवेगळ्या प्रसंगांना तोंड देऊन आपली निर्णयक्षमता कशी विकसित करता येईल, याचे अनुभवशिक्षण द्या. प्रचंड कष्ट करण्याची तयारी ठेवण्याचा कानमंत्र द्या. इतर मुलांशी तुलना करू नका. सकारात्मक विचारांची ज्योत त्याच्या मनात सतत तेवत ठेवा. ▮

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बीडमध्ये हवाला रॅकेटला एसपींचा दणका

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ सप्टेंबर**

बीड शहरात सुरु असलेल्या हवाला रॅकेटला बुधवारी पोलीस अधीक्षकांनी मोठा दणका दिला.बीड ग्रामीण आणि बीड शहरच्या पोलिसांनी संयुक्तरित्या कारवाई करीत बीड शहरात तीन ठिकाणी छापे मारले असून हवालाची लाखो रुपयांची रोकड जप्त केली आहे.त्यासोबतच हवाला रॅकेटसाठी वापरले जाणारे यंत्रे, मोबाईल देखील जप्त करण्यात आली आहेत.

बीड जिल्ह्यात सुरु असलेल्या अवैध धंद्यांना सध्या पोलिसांनी लक्ष केले आहे. बीड शहरात हवाला रॅकेट कार्यरत असल्याचे लक्षात आल्यानंतर पोलीस अधीक्षकांच्या आदेशावरून बीड ग्रामीण आणि बीड शहर पोलिसांनी बुधवारी सायंकाळी संयुक्त कारवाई केली. बीड शहराच्या कबाडगल्ली,डीपी रोडवरील धूत हॉस्पिटलजवळ आणि आणखी एकाठिकाणी पोलिसांनी कारवाई केली.यात तिन्ही ठिकाणाहून लाखो रुपये जप्त करण्यात आले आहेत. बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे बाळराजे दराडे, बीड शहरचे एपीआय राठोड,सिरसाट,मनोज परजणे,अश्फाक सय्यद यांनी ही कारवाई केली आहे.आणखी देखील पोलिसांची कारवाई सुरूच असून निश्चित रक्कमेची मोजदाद सुरु आहे.नूतन पोलीस अधीक्षकांनी केलेल्या या कारवाईने अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत.

# अखेर बबन शिंदेला अटक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ सप्टेंबर**

जिजाऊ मॉ साहेब मल्टीस्टेटच्या घोटाळ्यातील प्रमुख आरोपी असलेला बबन शिंदे याला अखेर बीड पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. उत्तर प्रदेशमधील मथुरा वृंदावन परिसरातून बबन शिंदेला अटक करण्यात आली आहे. जिजाऊ मल्टीस्टेट प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यापासून बबन शिंदे फरार होता.

बीडमधील जिजाऊ मॉ साहेब मल्टीस्टेट घोटाळा प्रकरणात बीड जिल्ह्यात ३ तर धाराशिव जिल्ह्यात २ गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी असलेला बबन शिंदे मागील वर्षीच्या जुलै महिन्यापासून फरार होता. त्याच्या शोधात ठिकठिकाणी पोलिस पथके कार्यरत होती मात्र सातत्याने आपली ठिकाणे बदलत, सीमकार्ड बदलत तो राहत होता. अखेर त्याच्या संदर्भाने गुप्त माहिती मिळाल्याने वृंदावन मथुरा परिसरात तो वेश बदलून राहत असल्याचे समोर आल्यानंतर आर्थीक गुन्हा शाखेच्या पथकाने सापळा रचला. पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनात आर्थीक गुन्हा शाखेच्या पथकाने मोठ्या शिताफिने साधुच्या वेशात राहत असलेल्या बबन शिंदेला बेड्या ठोकल्या आहेत.





बीड शहरात बुधवारी दुपारी जोरदार पाऊस झाल्याने अनेक भागातील रस्त्यावर असे पाणी साचले होते नागरिकांना पाण्यातुन वाहने चालवावी लागतात. (छाया कृष्णा शिंदे बीड)

# स्व.केशरकाकूंच्या पुण्यतिथी निमित्त समाधान महाराज शर्मांचे कीर्तन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ सप्टेंबर**

लोकनेत्या स्व.माजी खासदार केशरकाकू क्षीरसागर यांची शुक्रवार दि.४ ऑक्टोबर रोजी १८ वी पुण्यतिथी असून या निमित्त प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प.समाधान महाराज शर्मा यांचे सुश्राव्य कीर्तन आयोजित करण्यात आले असून तत्पूर्वी स्व. काकूंना आदरांजली वाहण्याचा कार्यक्रम समाधीस्थळी होणार आहे.

बीड रेल्वे मार्गाच्या शिल्पकार जिल्ह्याच्या लाडक्या लोकनेत्या स्व. केशरकाकू क्षीरसागर यांची शुक्रवार दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी १८ वी पुण्यतिथी असून या दिवशी सकाळी दहा वाजता स्व.काकूंच्या समाधीला आदरांजली वाहण्यात येणार आहे. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आणि क्षीरसागर कुटुंबीय तसेच काकूंच्या चाहत्यांच्या वतीने आदरांजलीचा कार्यक्रम झाल्यानंतर प्रसिद्ध किर्तनकार समाधान महाराज शर्मा यांच्या सुस्राव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता किर्तनाला सुरुवात होणार असून स्व.काकूंच्या चाहत्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन काकू-नाना प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# आ.क्षीरसागरांनी घेतली जलसंधारण, जलसंपदा, जलजीवन व पाटबंधारे विभागाची बैठक
# प्रलंबित असलेली कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ सप्टेंबर**

बीड मतदारसंघात जलसंधारण, जलसंपदा, जलजीवन मिशन विभागाशी संबंधित कामांच्या बाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी सदरील विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन विविध सूचना दिल्या. तसेच फुलसांगवी येथील आंदोलनच्या अनुषंगाने जिल्हा जलसंधारण अधिकारी व जायकवाडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांना निर्देश दिले.

बीड मतदारसंघातील अनेक गावांमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत कामे सुरू आहेत. परंतु ही कामे अनेक ठिकाणी प्रलंबित आहेत. तसेच मतदारसंघात जलसंधारण, जलसंपदा विभाग यांच्याशी संबंधित नागरीकांच्या काही अडचणी आणि मागण्या होत्या याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.२४) रोजी बीडमध्ये शासकीय विश्रामगृह येथे जलसंधारण, जलसंपदा, पाटबंधारे विभाग, जलजीवन मिशन, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. यावेळी नागरिकांच्या समोरच अधिकार्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. यासोबतच बीड मतदारसंघ क्षेत्रात शिरूर-कासार तालुक्यातील फुलसांगवी व इतर गावातील ग्रामस्थांचे काही दिवसांपूर्वी जलसंधारण विभागाशी संबंधित कामांच्या अनुषंगाने आंदोलन सुरू होते. या आंदोलनातील मागण्या मार्गी लावण्यासाठी आ.क्षीरसागर यांनी जिल्हा जलसंधारण अधिकारी व जायकवाडी पाटबंधारे प्रकल्प कार्यकारी अभियंता तसेच पाटबंधारे विभागाचे अधिकारी यांना सूचना दिल्या. या बैठकीसाठी संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी व संबंधित नागरिक, शेतकरी बांधव उपस्थित होते.



बीडचे कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारी अविनाश बारगळ यांना वाढदिवसाच्या तरूणभारतकडून शुभेच्छा देतांना तरूण भारतचे जिल्हा प्रतिनिधी जगन्नाथ देशमुख

# भगवान परशुराम महामंडळ स्थापनेच्या निर्णयाचे फटाक्यांची आतिषबाजी करत पेशवा प्रतिष्ठान तर्फे स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२५ सप्टेंबर**

ब्राह्मण समाजासाठी राज्य सरकारने अखेर भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ मंजूर केल्याबद्दल अंबाजोगाई येथील स्वा. सावरकर चौकात मोठया प्रमाणात आतषबाजी करून जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी घोषणांनी परिसर दणाणून गेला. सुरुवातीला स्वा. सावरकर यांना अभिवादन करण्यात आले

यावेळी पेशवा प्रतिष्ठान चे राहुल कुलकर्णी, डॉ महेश अकोलकर, डॉ संकेत तोरंबेकर, श्रीकांत जोशी, केदार दामोशान , पार्थ कुलकर्णी, दीपक कुलकर्णी,ड वैजनाथ वांजरखेडे, विशाल जहागीरदार, उप जिल्हाप्रमुख गजानन मुडेगावकर, शिवसेना नेते शिवाजी दादा कुलकर्णी, दीनदयाल बँकेचे संचालक मकरंद कुलकर्णी, दुर्गादास दामोषण, शरद देशपांडे, पद्माकर सेलमोकर,विवेक वालेकर, अभय जोशी, निलेश जोशी, श्रीपाद देशमुख, माऊली केंद्रेवाडीकर,पंडित विडेकर ,श्री महाजन, प्रदीप नांदगावकर,श्री बाभुळगावकर, मंदार काटे यांच्यासह ब्रह्मवृंदाची उपस्थिती होती. यावेळेस राहुल कुलकर्णी यांनी युती सरकारचे मुख्यत्वे करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले . तसेच महामंडळ व्हावे यासाठी दोनदा आमरण उपोषणाला बसलेले ब्राह्मण योद्धा दीपक रणनवरे व बाजीराव धर्माधिकारी यांनी हे महामंडळ स्थापन करण्यासाठी केलेल्या सहकार्याबद्दल ऋण व्यक्त केले.

# संस्थेतील प्राध्यापकांचा विद्यार्थ्यांशी सुसंवाद निर्माण व्हावा- डॉ.राहुल खडके

**आदित्य पॉलीटेक्निकमध्ये विद्यार्थ्यांचा कार्यपरिचय उपक्रम, पालक मेळावा उत्साहात**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ सप्टेंबर**

संस्थेतील प्राध्यापकांचा विद्यार्थ्यांशी सुसंवाद निर्माण होणे गरजेचे आहे. त्यांना शैक्षणिक वातावरणाशी जुळवून घेता यावे व तंत्रनिकेतनाचे शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल या साठीच संस्था सदैव प्रयत्नशील असते. संस्था तसेच महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आदित्य शिक्षण संस्थेत नेहमीच विविध उपक्रम राबवले जातात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास होतो. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.राहुल खडके यांनी केले.

शहरातील आदित्य शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा याकरिता आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. अदिती सारडा,संचालक डॉ.आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य पॉलीटेक्निक मध्ये प्रथम वर्षीय विद्यार्थ्यांसाठी कार्यपरिचय उपक्रम व विद्यार्थी ,पालक स्वागत मेळावा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.राहुल खडके बोलत होते.

कार्यपरिचय उपक्रमात एआयसीटीई, तंत्रशिक्षण संचालनालय, एमएसबीटीई, तंत्रनिकेतन संस्था, आदित्य एज्युकेशन ग्रुप या संस्थेतील सोयीसुविधा, अभियांत्रिकीच्या विविध शाखा, त्यांचे परस्परांशी असलेले संबंध, व्यक्तिमत्त्व विकास, संगणकीय सुविधा, त्यांचे महत्त्व, विविध अभ्यासक्रम, पदविका अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतरच्या करिअर संधी, अशा अनेक विषयांवर प्रथम वर्षीय प्राध्यापक प्राध्यापिका यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राहुल खडके उपस्थित होते. विभागप्रमुख प्रा. दुधाळ, प्रा. जाधव डी. एम. यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रथम वर्ष कोर्स कॉर्डिनेटर प्रा. तेजस्विनी आरडे , प्रा. गजानन खालापुरीकर , प्रा. आकांक्षा सवासे, प्रा.अशोक मुंडे, प्रा.मयुरी गोंटे ,प्रा. दुर्गे यांनी मेहनत घेतली.

# सिओ अंधारे मॅडम बीड शहरामधील साफसफाईकडे जातीने लक्ष द्या-नवनाथ शिराळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ सप्टेंबर**



दोन दिवसापासून बीड शहरामध्ये वरूनराजा बरसत असून, मुसळधार पावसामुळे बीड शहराला तलावाचे स्वरूप आले आहे. याकडे गांभीर्याने लक्ष देऊन, स्वच्छता मोहीम राबवावी. असे आवाहन नवनाथ शिराळे पाटील यांनी केले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की गेली दोन दिवसपासून बीड शहरामध्ये प्रचंड मुसळधार पाऊस बरसला असून, शहरातील व उप नगरातील नाल्या गटारे तुंबल्यामुळे बऱ्याच ठिकाणी रस्ते बंद झाले असून, दुकाने, हॉटेल, घर इत्यादीमध्ये पाणी शिरले आहे. याकरिता अंधारे मॅडम आपण बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी आहात, शहरातील सर्व सामान्य व्यापारी यांचा व्यवसाय डबघाईस आला आहे. अस्वच्छतेमुळे रोगराई वाढण्याची शक्यता आहे. डास निर्मुलन करिता शहरात धूर फवारणी करावी.तसेच शहरामध्ये अंधाराचे साम्राज्य असून, पथदिवे बसवण्यासाठी जातीने लक्ष द्यावे. सर्व व्यापारी मंडळी बीड नगरपालिकेकडे इमाने इतबारे व्याजासह घर पट्टी, नळ पट्टी इत्यादी टॅक्स भरत आहेत. याबत अंधारे मॅडम बीड शहरात फेर फटका मारून संबधितांना आदेश देऊन, नाले, गटारे साफसफाई मोहीम राबवावी, अन्यथा सर्व सामान्य नागरिकांसह व्यापारी मंडळी रस्त्यावर उतरतील याची आपण गांभीर्याने दखल घ्यावी. असे आवाहान भाजपा जेष्ठ नेते तथा माजी नगर परिषद सभापती नवनाथ शिराळे पाटील यांनी केले आहे.

# जुनी पेन्शन, कंत्राटी शिक्षक भरतीचा निर्णय रद्द करण्याची मागणी

## विविध मागण्यांसाठी २६५४ शिक्षक सामुहीक रजेवर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ सप्टेंबर**
विद्यार्थी व शिक्षक यांचेवरील संचमान्यता बाबतचा दि १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय रद्द करावा, कंत्राटी शिक्षक भरती रद्द करावी, जुनी पेन्शन योजना लागू करावी यासह इतर मागण्यांसाठी शिक्षक संघटनांच्यावतीने भर पावसात बुधवार दि २५ सप्टेंबर रोजी भव्य मोर्चा काढण्यात आला. यावेळी शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्यामार्फत शासनाला निवेदन सादर केले आहे. २६५४ शिक्षक सामुहीक रजेवर जाणार आहेत.

येथील जिल्हा परिषदेच्या मैदानावरून शिक्षकांनी विविध मागण्यांसाठी भव्य मोर्चा काढला. या मोर्चात सर्व शिक्षक संघटनांनी सहभाग घेतला होता. शहरातील प्रमुख मार्गावरून हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी शासन विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यावर अन्याय करणारे निर्णय घेत असून यामुळे शिक्षण व्यवस्था कोलमडणार आहे. शिक्षण हक्क कायदा २००९ मधील तरतुदीस विसंगत १५ मार्च २०२४, ५ सप्टेंबर २०२४ च्या शासन निर्णयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांचे अस्तित्वच संपणार आहे. यावेळी शिक्षकांनी जोरदार घोषणाबाजी करीत वरील शासन निर्णय रद्द करावा अशी मागणी केली. तसेच आधारकार्ड आधारीत शिक्षक पद निर्धारण धोरण रद्द करावे, सातव्या वेतन आयोगातील पदवीधर शिक्षकांच्या व सन २००४ नंतर सेवेत रूजू झालेल्या शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी धारक शिक्षकांच्या वेतन त्रुटीचा विषय मार्गी लावावा, जुनी पेन्शन योजना लागू करावी, विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वाटप करावे, शैक्षणिक-अशैक्षणिक कामाच्या शासन निर्णयात शिक्षक संघटनांसह चर्चा करून दुरूस्ती करावी, जि प शिक्षकांना मुख्यालयी निवासाची सक्ती रद्द करावी, राज्यातील शिक्षकांना १०-२०-३० सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना लागू करावी, सर्व पदवीधर शिक्षकांना सरसकट पदवीधर वेतनश्रेणी लागू करावी, शालेय पोषण आहार योजना स्वतंत्र यंत्रणेकडे सोपवावी, समान काम समान वेतन या धर्तीवर विषय शिक्षकांना सरसकट पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करावी आदी मागण्यांचा समावेश आहे. या आंदोलनात विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी तसेच शिक्षक, शिक्षिका सहभागी झाले होते. यावेळी शिक्षकांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.

# डोंगरगाव पूल येथे मराठा तरूणांचे जलसमाधी आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ सप्टेंबर**
मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या आमरण उपोषणाला पाठींबा आणि मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे या मागणीसाठी कळमनुरी तालुक्यातील डोंगरगाव पूल येथील कयाधू नदीच्या पात्रात मराठा तरूणांनी बुधवार दि २५ सप्टेंबर रोजी जलसमाधी आंदोलन करीत एक मराठा लाख मराठा अशा घोषणा दिल्या.

अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे यासह इतर मागण्यांसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनाचा आज नववा दिवस असून त्यांची प्रकृती ढासळत असूनही शासन आंदोलनाची दखल घेत नसल्यामुळे मराठा समाजामध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. त्यांच्या आंदोलनास हिंगोली जिल्ह्यातून पाठींबा मिळत असून हिंगोली येथे आमरण उपोषण, येहळेगाव सोळंके, हट्टा, औंढा नागनाथ येथे उपोषण तसेच दि २४ रोजी वसमत बंद करण्यात आले आहे.

कळमनुरी तालुक्यातील डोंगरगाव पूल येथील कयाधू नदीच्या पाण्यात परिसरातील मराठा तरूणांनी जलसमाधी आंदोलन केले आहे. यामध्ये डोंगरगाव पूल, येहळेगाव, साळवा, आखाडा बाळापूर, कामठा, येलकी, बेलथर, जरोडा, कोळी हदगाव, डोंगरकडा येथील तरूणांचा समावेश आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी या तरूणांनी प्रचंड घोषणाबाजी करीत पाण्यात जलसमाधीसाठी उतरले. घटनास्थळी पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुट्ठे, सपोनि ज्ञानेश्वर बसवंते, जमादार शिवाजी पवार, मधुकर नागरे, नागोराव बाभळे यांच्यासह मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दुपारपर्यंत आंदोलन सुरूच होते. अनुचीत प्रकार घडू नये यासाठी तरूणांना बाहेर काढण्यासाठी पोहणाऱ्या व्यक्तींना परिसरात तैनात करण्यात आले आहे. या आंदोलनात गोविंद देशमुख, आदीनाथ करंडे, शिवराम करंडे, ऋषीकेश पतंगे, माधव काळे, नथु तावडे, संतोष काकडे, विठ्ठल भागवत, शंकर गावंडे आदींचा सहभाग होता.

# उपप्रादेशिक परिवहन कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप सुरू

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ सप्टेंबर**
उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कामकाजामध्ये सुसुत्रता यावी यासाठी परिवनह आयुक्त कार्यालयाने गठीत केलेल्या कळसकर समितीचा अहवाल दोन वर्षापूर्वीच प्रशासनास सादर केलेला आहे. त्या अहवालाची अंमलबजावणी अद्याप न झाल्याने कर्मचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. प्रलंबीत मागण्या तत्काळ मंजूर करून अंमलबजावणी करावी या मागणीसाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी दि २५ सप्टेंबरपासून बेमुदत संप पुकारला आहे.



येथील उपप्रादेशिक कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी बुधवार दि २५ सप्टेंबरपासून बेमुदत संप पुकारल्यामुळे कामकाजावर परिणाम झाला आहे. प्रलंबीत मागण्यांमध्ये प्रशासकीय स्तरावरील विविध पदांचे सेवा प्रवेश नियम गेल्या दोन वर्षापासून मंत्रालयात निर्णयाविना पडून आहेत. परिवहन प्रशासनाकडून याबाबत कोणतीही उचित कार्यवाही होत नसल्यामुळे सदरचे सेवा प्रवेश नियम प्रलंबीत राहीले आहेत. मंजूर आकृतीबंधानुसार निरसित झालेल्या पदांवरील कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना अनाकलनीयरित्या विभागीय परिक्षेचे बंधन घालण्यात येत आहे. विभागीय परीक्षेबाबत प्रशासनाने कर्मचाऱ्यांवर अन्याय केला आहे. बदल्यांसाठी पात्र असलेल्या मुंबई विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या होत नाहीत किंवा त्यांच्या कार्यभारात बदल होत नाहीत याबाबत मुंबई विभागातील कर्मचाऱ्यांची कमालीची नाराजी आहे. सदरील प्रलंबीत मागण्यांबाबत प्रशासनाचे उदासीन धोरण असल्याने मोटार वाहन विभागातील कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक रास्त बाबींना मोठे आव्हान निर्माण झाले आहे. सदरील मागण्या तत्काळ मान्य कराव्यात अशी मागणी मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे.



हिंगोली- स्वच्छता ही सेवा अंतर्गत नगर पालिकेमार्फत रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रांगोळींची पाहणी करतांना मुख्याधिकारी अरविंद मुंढे, शाम माळवटकर, बाळू बांगर आदी. छाया- विजय गुंडेकर

# लॅपटॉप खरेदीच्या अर्थसहाय्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी प्रस्ताव सादर करावेत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २५ सप्टेंबर**
जिल्हा परिषद सेस योजना सन २०२४-२५ मधून २० टक्के मागासवर्गीय कल्याण निधी अंतर्गत ग्रामीण भागातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लॅपटॉप खरेदीसाठी अर्थसहाय्य पुरविण्यासाठी तालुकास्तरावरुन प्राप्त झालेल्या अर्जामधून अंतिम पात्र ठरलेल्या १२३ लाभार्थ्यांच्या निवडीस जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाच्या निवड समितीने मान्यता दिली आहे. निवड झालेल्या लाभार्थ्यांची यांदी पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आली आहे.

निवड झालेल्या लाभार्थ्यांनी सर्व प्रथम लॅपटॉप खरेदी करुन खरेदीच्या जीएसटी पावतीसह अनुदान मागणीचा प्रस्ताव जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे सादर केल्यानंतर अनुदानाची रक्कम ३० हजार रुपये लाभार्थींच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात येणार आहे. त्यामुळे निवड यादीतील लाभार्थ्यांनी सर्वप्रथम स्वखर्चाने लॅपटॉप खरेदी करुन अनुदान मागणीचा प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी राजू एडके यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### कोनाथा शाळेत शालेय साहीत्याचे वाटप



वसमत- तालुक्यातील कोनाथा येथील जिल्हा परिषद शाळा समितीचे उपाध्यक्ष मिलिंद मस्के यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त मुला मुलींना वही व पेन वाटप करून वाढदिवस साजरा केला. शिक्षकांच्यावतीने मस्के यांचे आभार मानले. या कार्यक्रमाला शाळा समिती अध्यक्ष दत्तराव शिंदे, उपाध्यक्ष मिलिंद मस्के, सरपंच राजरत्न कुंटे, काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष संजय खंदारे व शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित होते. यावेळी बोलतांना मस्के म्हणाले की, जिल्हा परिषद शाळेत गोरगरीबांचे, शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेत असतात. हारतुरे, बॅनर्स यांच्यामध्ये पैसा खर्च न करता अशाप्रकारची मदत केल्यास शाळेतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मदत होईल.

### महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृती अर्जाची अंतीम मुदत वाढविण्याची अभाविपची मागणी

हिंगोली- २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी महाडीबीटी वेबसाइटवर शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रिया बंद करण्यात आली आहे. या संदर्भात अनेक विद्यार्थ्यांनी समाजकल्याण विभाग, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संपर्क करून समस्या निदर्शनास आणून दिलेली आहे. परंतु कुठल्याही प्रकारची कार्यवाही न केल्यामुळे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, देवगिरी प्रदेशाच्या वतीने महराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांना निवेदन देऊन शिष्यवृत्ती अर्ज भरण्यास मुदत वाढ देण्याची मागणी केली आहे. प्रदेश मंत्री कु.वैभवी ढिवरे म्हणाल्या की, महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थी विद्यापीठाचे निकाल वेळेवर न लागणे व प्रवेश प्रक्रियेस विलंब झाल्यामुळे शिष्यवृत्ती अर्जाच्या अंतिम तारखेच्या मुदतीत फॉर्म भरू शकले नाहीत. यामुळे अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे शासनाने तत्काळ शिष्यवृत्ती अर्ज भरण्यास मुदत वाढ द्यावी अन्यथा विद्यार्थी परिषद तीव्र स्वरूपाचे आंदोलन करेल.

### पोलिसांची २१ वाहन चालकांविरूध्द कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २१ वाहनचालकांविरूध्द पोलिस विभागाने कार्यवाही करीत त्यांच्याकडून १३ हजार १०० रूपयांचा दंड वसूल केला आहे तसेच अवैध दारू विक्री करणाऱ्या दोन ठिकाणी पोलिसांनी छापा मारून आरोपीतांकडून १७०० रूपयांची मुद्देमाल जप्त केला आहे.

# समाज कल्याणच्या योजनांचा लाभ देण्याचे आमिष दाखवून फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ सप्टेंबर**
जिल्हा परिषद समाज कल्याण विभागातील शिलाई मशीन, पिठाची गिरणी या योजनांचा लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखवून भामटेगिरी करण्याचे प्रकार सुरू असून त्यापासून नागरिकांनी सतर्क रहावे असे आवाहन समाज कल्याण अधिकारी राजू एडके यांनी केले आहे.

हिंगोली जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडून विविध योजना राबवल्या जातात. मागासवर्गीय व दिव्यांगांसाठी असलेल्या योजनांचा समावेश असून त्यामध्ये वैयक्तिक लाभाच्या योजनांचा समावेश आहे. या योजनेसाठी लाभार्थ्यांकडून अर्ज प्राप्त करून घेत त्यातून पात्र लाभार्थ्यांची निवड करून त्यांना योजनांचा लाभ दिल्या जातो. मात्र मागील काही दिवसांत समाज कल्याण विभागाकडून शिलाई मशीन व पिठाची गिरणी या योजनांचा लाभ देण्याचे आमिष दाखवत भामटेगिरी केली जात आहे. गावपातळीवर महिलांशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून त्यांच्याकडून योजनेच्या लाभासाठी पैसे मागितले जात आहेत. यामध्ये महिलांना ऑनलाईन पैसे पाठविण्याचे कळविले जात असून पैसे मिळाल्यानंतर लगेचच योजनांचा लाभ दिला जाईल असे सांगितले जात आहे. या संदर्भात काही महिलांकडून समाज कल्याण विभागाकडे विचारणा झाल्यानंतर या प्रकराचा भांडाफोड झाला आहे.

दरम्यान, जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडून अशा प्रकाराच्या शासकीय योजना राबवल्या जात नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांनी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधणाऱ्यांसोबत कुठल्याही प्रकारचा पैशाचा व्यवहार करू नये तसेच त्यांना प्रतिसाद देऊ नये. कोणत्याही प्रकारच्या योजनांची माहीती हवी असल्यास लाभार्थ्यांनी थेट जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन समाज कल्याण अधिकारी राजू एडके यांनी केले आहे.



हिंगोली- शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोन दुचाकीची समोरासमोर धडक झाल्यानंतर याठिकाणी वाहतुकीची कोंडी झाली होती. छाया- विजय गुंडेकर

# सांदीपनीच्या दोन विद्यार्थीनींची ऑर्चरीविद्येत राज्यस्तरावर निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ सप्टेंबर**
क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे-१,जिल्हा क्रीडा परिषद, व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेड,व नांदेड जिल्हा आर्चरी असोसिएसन,नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय शालेय आर्चरी क्रीडा स्पर्धा २०२४-२५ श्री गुरु गोविंद सिंघजी स्टेडियम, नांदेड येथे दि.२४ ते २५ सप्टेंबर दरम्यान पार पडल्या. या स्पर्धेत लातूर, धाराशिव व नांदेड जिल्ह्यातील खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या विभागीय धनुरविद्या क्रीडा स्पर्धे मध्ये स्थानिक संदिपानी पब्लिक स्कूल सुनील नगर, तरोडा बु. नांदेड येथील वयोगट १७ वर्ष मुली मध्ये कु. विशाखा राजीव चव्हाण आणि कु.दिक्षा उमाकांत हडोळतिकर यांनी आर्चरी (रिकव्हर राउंड) क्रीडा स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदक पटकाविले असून त्याची राज्यस्तरीय आर्चरी क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या निवडीबद्दल शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ.महेश्वरी राठोड, सौ.रेश्मा विपुल राठोड, प्राचार्या श्रीमती क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मेकाले, क्रीडा शिक्षक व मार्गदर्शक भाऊराव राठोड, शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# हिंगोलीतील सकल मराठा समाजाचे आमरण उपोषण स्थगीत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ सप्टेंबर**



मराठा आंदोलक मनोज जरांगे यांना पाठींबा देण्यासाठी तसेच मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी सकल मराठा समाजाच्यावतीने मागील चार दिवसांपासून आमरण उपोषण सुरू होते. उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांच्या मध्यस्थीनंतर उपोषण तूर्त स्थगीत करण्यात आले. यावेळी उपोषणार्थींना ज्युस पाजवून उपोषण सोडण्यात आले.

येथील छत्रपती शिवाजी महाराज पूतळा परिसरात मराठा आंदोलक मनोज जरांगे यांना पाठींबा देण्यासाठी सकल मराठा समाजाचे आंदोलक बालाजी वानखेडे, त्र्यंबकराव लोंढे, रमेश जाधव, परमेश्वर तांबिले, ज्ञानेश्वर जगतापयांनी आमरण उपोषण सुरू केले होते. या आंदोलनाची दखल घेत प्रशासनाच्यावतीने उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांनी आंदोलकांशी चर्चा करून उपोषण सोडण्याची विनंती केली. या विनंतीला मान देत उपोषण तूर्त मागे घेण्यात आले आहे. यावेळी पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, मनोज आखरे, विनायक भिसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हाधिकारी कार्यालयावर शिक्षकांचा 'आक्रोश मूक मोर्चा'

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २५ सप्टेंबर -**

शासनाद्वारे, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपासून शिक्षकांना दूर लोटण्याचे धोरण आखले जात आहे की काय ? अशी शंका उपस्थित केली जात आहे. शिक्षकांच्या अनेक ज्वलंत प्रश्नांबाबत शासन स्तरावरून लवकर कोणतीही अनुकूल भूमिका घेतली जात नाही. शिक्षकांच्या प्रत्येक प्रश्नावर तोडगा काढण्याबाबत शासन उदासीन असल्याची भावना शिक्षकांत निर्माण होत आहे. त्यामुळे राज्यातील प्राथमिक शिक्षकांपुढे तीव्र आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरलेला नसल्याने, जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये शिकविणाऱ्या सर्व शिक्षक संघटना, समन्वय




समिती नांदेड यांच्याकडून कलामंदिर पासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत २५ सप्टेंबर रोजी आक्रोश मूक मोर्चा काढण्यात आला.

दि.१५ मार्च २०२४ चा संचमान्यतेचा शासन निर्णय रद्द करावा, डी एड- बी एड बेरोजगारांचे कारण पुढे करून, १० व १० पेक्षा कमी पटाच्या शाळेवर कंत्राटी शिक्षकाची नेमणूक करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. पवित्र शिक्षण क्षेत्रात शिक्षक कंत्राटी धोरण राबवून शासनाने शिक्षणाची खिल्ली उडवली आहे. अप्रत्यक्षपणे शिक्षकांबाबत वेठबिगारीचे धोरण अवलंबले आहे. हे कंत्राटी धोरण रद्द झाले पाहीजे अशैक्षणिक कामे कमी करावे, दि. १ नोव्हेंबर २००५ व तद्नंतर सेवेत नियुक्त झालेल्या शिक्षकांना १९८२ सालची जुनी पेन्शन योजना लागू करावी. मुख्यालयी राहण्याची अट रद्द करावी, आश्वासित प्रगती योजना शिक्षकांना लागू करावी, कॅशलेश आरोग्य योजना लागू करावी, सर्व विषय शिक्षकांना सरसकट पदवीधर वेतनश्रेणी देण्यात यावी, सातव्या वेतन आयोगातील पदवीधर शिक्षकांच्या व वरिष्ठ वेतनश्रेणी धारक शिक्षकांच्या वेतन त्रुटीचा विषय मार्गी लावावा. अद्यापही अनेक ठिकाणी पाठ्यपुस्तके मिळालेली नाहीत. त्याठिकाणी तातडीने पाठ्यपुस्तके पुरवावीत, पाठ्यपुस्तकांना कोरी पाने न देता स्वतंत्र स्वाध्याय पुस्तिका द्याव्यात, विद्यार्थ्यांना मोफत गणवेश अविलंब मिळावेत, अनुकंपा तत्त्वावर नियुक्त शिक्षकांना TET अनिवार्य बाबतचा शासन निर्णय रद्द करावा, शालेय पोषण योजना स्वतंत्र यंत्रणेकडे हस्तांतरित करावी. आदी प्रमुख मागण्यांसह इतर अनेक मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जिल्ह्यातील सर्व शाळेतील शिक्षक सामूहिक रजा घेवून जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मूक मोर्चा काढला. या मोर्चात माईक व स्पीकर्स लावण्यात आले नव्हते. भाषणे व घोषणांही नव्हत्या. मागण्यांसंदर्भातची छोटी फलके मोर्चातील शिक्षकांच्या हाती होते. तसेच एक मोठे बॅनर मोर्चासमोरील शिक्षकांच्या हाती होते. विविध मागण्या मान्य व्हावे म्हणून काढण्यात आलेल्या आक्रोश मूक मोर्चात नांदेड जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटनांचे प्रमुख पदाधिकारी आणि शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झालेले होते.

# शिरीष गोरठेकर विधानसभा निवडणूकीच्या मैदानात ?



**तभा वृत्तसेवा**
**उमरी, दि. २५ सप्टेंबर -**

नायगाव मतदार संघ राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाला सुटल्यास गोरठेकर घराण्यातील युवा चेहरा शिरीष देशमुख गोरठेकर हे विधानसभेची उमेदवारी घेवून राजकीय मैदानात सर्व ताकदीनिशी उतरणार असल्याचे पत्रकार परिषेदेत ऐलान केले आहे .

महाराष्ट्रात महाविकासआघाडी ने काँग्रेस कडून नांदेड लोकसभा निवडणुकीसाठी खासदार उमेदवार म्हणून स्व .खासदार वंसतराव चव्हाण यांचे सुपुत्र प्रा रविंद्र पाटील चव्हाण यांची उमेदवारी जवळपास नाव निश्चित झाल्याची चर्चा आहे .

त्या प्रमाणे पुर्वी नायगाव मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला विधानसभेची उमेदवारी देण्यात आली होती त्यावेळी बापूसाहेब देशमुख गोरठेकर यांनी निवडणूक लढवली होती त्या प्रमाणे नायगाव विधानसभेची उमेदवारी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाला दिल्यास पुन्हा गोरठेकर घराण्यातील शिरीष देशमुख गोरठेकर यांना आमदार होण्याची संघी मिळेल आणि स्व . माजी आमदार बापूसाहेब देशमुख गोरठेकर यांचे मतदार संघातील विकासाचे स्वप्न पूर्ण होतील .

महाराष्ट्र सरकार ऐकी काळी म्हणजे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या काळात एका मतानी पडणार होते पण याच गोरठेकर घराण्यातील कै . माजी आमदार बाबासाहेब देशमुख गोरठेकर यांनी निस्वार्थ बिन शर्यत पांठीबा देवून सरकार वाचवलय त्याची एक परतपेढ म्हणून शरद पवार यांनी राष्ट्रवादी गटाला जागा सोडून करावी अशी मागणी नायगाव मतदार संघातील नायगाव, धर्माबाद , उमरी तालुक्यातील शरद पवार गटातील कार्यकर्त्यांनी एकमुखी निर्धार केला आहे .

गोरठेकर घराण्याने निस्वार्थी निष्कलंक शब्दाला जागणारा ब्रॅन्ड म्हणजे गोरठेकर होय याच घराण्यातील नवखा चेहरा राजकारणातील तिसरी पिडी त्याच तत्वाने सक्रिय झाली आहे गेली २० वर्षापासुन उमरी पंचायत समितीवर गोरठेकर घराण्याचे राजकीय वर्चस्व , नगरपालीवर १५ वर्षा पासून सत्ता ताब्यात आहे शिरिष देशमुख गोरठेकर हे सभापती, उपसभापती,कृषीउत्पन बाजार समिती सभापती पद उत्तमरित्या भुषविले आहेत त्यांच्याकडे एक नेता म्हणून बघीतले जाते धर्माबाद - नायगाव उमरी या तालुक्यात गोरठेकर यांचा दांडगा संपर्क असल्याने गेल्या अनेक विधानसभा लोकसभा निवडणुकीत खासदार , आमदार म्हणून निवडून गेले त्यामध्ये गोरठेकर यांचा सिंहाचा वाटा आहे म्हणून अशा घराण्यातील माजी आमदार सुपुत्र शिरीष देशमुख गोरठेकर यांची विद्यानसभेची उमेदवारी द्यावी जनतेची इच्छा आहे तसे शिरीष गोरठेकर म्हणाले की विद्यान सभेचे तिकीट भेटल काय न भेटल काय ? महविकास आघाडीचे धर्म पाळणार पण राष्ट्रवादी शरद पवार गटातील वरिष्ट नेत्याकडे तिकीट मिळावे यासाठी आमचा प्रयत्न चालू आहे ते सर्वस्वी निर्णय शरद पवार साहेब घेतील त्यांच्या आदेशाची आशीर्वाची वाट पहात आहोत असे ही गोरठेकर यांनी पत्रकार परिषेदेत प्रतिक्रीया दिली आहे .

## संक्षिप्त वृत्त

### गाव कामगार पोलीस पाटील संघाचा राज्य मुख्य संघटक पदी संभाजी पाटील मंडगीकर

**देगलूर-** तालुक्यातील मौजे मंडगी येथील पोलीस पाटिल असुन संभाजी काळेसे पाटील मंडगीकर उच्च शिक्षित असून हे २०१२ पासून महाराष्ट्राचे गाव कामगार संघटनेमध्ये काम करत असून त्यांनी जिल्ह्यामध्ये जिल्हा सचिव म्हणून बारा वर्षे काम पाहत आहेत त्यांच्या या कामाबद्दल राज्यातील राज्याध्यक्षांनी त्यांच्या कामाची जबाबदारी वाढवली असून त्यांना राज्याच्या मुख्य संघटित पदी सर्वानुमते निवड करण्यात आले गेल्या बारा वर्षांपासून त्यांची कार्यशैली कामातील पारदर्शकता व सर्व पोलीस पाटलांना संघटित ठेवून त्यांच्या अडीअडचणीमध्ये सर्व परिभाग घेतात म्हणूनच त्यांची आज महाराष्ट्र राज्य गावकामगार पोलीस पाटील संघाच्या आळंदी(पुणे) येथे झालेल्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये संभाजी पाटील मंडगीकर यांची राज्याच्या मुख्य संघटक पदी सर्वानुमते निवड करण्यात आली यावेळी राज्याचे राज्य अध्यक्ष बाळासाहेब शिंदे पाटील , राज्य सचिव मांगले पाटील, व कार्याध्यक्ष श्रीकृष्ण साळुंखे पाटील, यांनी संभाजी पाटील यांच्यावर मोठी जबाबदारी दिली त्यांच्या आतापर्यंतच्या संघटने विषयी केलेल्या कामाची पावती त्यांना मिळाली. त्यांची निवड झाल्यामुळे नांदेड जिल्ह्याचे संघाचे जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील कक्काळ .परभणी जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष तुकाराम रेंगे पाटील लातूर जिल्हाध्यक्ष अशोक पाटील ,हिंगोली जिल्हाध्यक्ष वसंतराव आव्हेर पाटील ,बीड जिल्हाध्यक्ष, संभाजी नगर जिल्हाध्यक्ष,बीड जिल्हाध्यक्ष व राज्याचे सर्व जिल्हाध्यक्ष तसेच शिवाजीराव शिंदे पाटील अर्जुनराव दुबे पाटील कस्तुरे पाटील श्रीराम पाटिल चाकुरकर तालुका अध्यक्ष देगलुर तालुका सचिव सुनिल हुडे जिल्हा संघटक मारुती इंगोले पाटिल यांनी अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

### सिईओ मिनल करनवाल यांची हाणेगाव ग्रामपंचायत व कन्या शाळेला भेट

**हाणेगाव-**नांदेड जिल्हा परिषदेच्या सिईओ मिनलताई करनवाल यांची हाणेगाव येथील ग्रामपंचायत कार्याल व केंद्रिय प्राथमीक कन्या शाळेला भेट दिली आहे. यावेळी सर्वप्रथम शाळेत भेट दिली असता शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक विद्यार्थ्यांनी आलेल्या सर्व पाहुण्यांच लेजीम पथकाच्या माध्यमातुन स्वागत करुन त्यांचा भव्यदिव्य असा सत्कार केले .यावेळी शाळेची सर्व माहीती रीतसर पाहिल्यानंतर त्यांनी काही मार्गदर्शनपर सुचना करुन मुख्यापक यांना प्रशस्तीपत्र देऊन आय एस ओ मान्यांकन दर्जा दिला आहे.यानंतर तालुक्यात सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या कार्यालयात ग्रामपंचायत सरपंच सौ शारदादेवी शंकराराव राठोड व उपसरपंच मुजीप चमकुडे ग्रामविकास अधीकारी अमोल जाधव व सर्व ग्रा.पं सदस्यांच्या वतीने आलेल्या सर्व पाहुण्यांचा भव्य असा सत्कार करण्यात आला यावेळी सिओ समोर संपूर्ण ग्रामपंचायतीची रीतसर माहीती सांगण्यात आली यावेळी सिओनीं समाधान व्यक्त करुन सरपंच उपसरपंच ग्रामविकास अधीकारी सर्व सदस्यांना शुभेच्छा देऊन ग्रामपंचायतीला आय एस ओ मान्यांकनाचा दर्जा दिला आहे यावेळी गावातील सर्व नागरीकांनी टाळ्यांच्या गडगडाटात ते प्रशस्तीपत्र स्वीकारला आहे .यानंतर गावातील नागरीकांनी जि.प.हा.शाळेच्या विकासाचा मुद्दा मांडला तेथील परीस्थितीपर सखोल चर्चा केल्यानंतर मिनल करनवाल यांनी एक वर्ग खोली मंजुर करुन देण्याच आश्वासन दीले व ग्रामपंचायतीच्या कामकाज साफसफाई सुसज्ज ईमारत व्यवस्थेला पाहुन समाधान व्यक्त केले आणि येथील सरपंच उपसरपंच सर्व सदस्यांच कौतुकही केले आहे.यावेळी विस्तार अधीकारी बालाजी उमाटे,शिक्षण अधीकारी बिरगे मेडम,मुक्कावार साहेब,ए.जोशी,ग्रामविकास अधीकारी अमोल जाधव ग्रा.पं.सदस्य उमाकांत पंचगल्ले,विवेक पडकंठवार, दिलीप बंदखडके,हज्जु चमकुडे, वसंत आडेकर, नागेंद्र गीरेवाड,वैजीनाथ चलवे,शंकरराव राठोड मुक्तार पटेल,मुबीन शेख,यादव सुर्यवंशी,बिरादार सर,पाटील सर,वाडीयार सर,ग्रा.पं.कर्मचारी महादेव नामेवार,सचीन भंडारे,नामदेव पवार,कपील तलारे, आमद आतार आदी उपस्थीत होते.

### राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या शहराध्यक्षपदी मुकेश कांबळे यांची निवड

**मुदखेड-**आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या आदेशानुसार व नांदेड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हा अध्यक्ष तथा विरोधी पक्ष नेते जीवन पाटील घोगरे यांच्या



मार्गदर्शनाखाली तसेच राष्ट्रवादी काँग्रेस नांदेड जिल्हा सरचिटणीस राहुल चौदंते यांच्या पुढाकारातून दि. २१ सप्टेंबर रोजी मुदखेड शहरातील शासकीय विश्रामगृह येथे पक्षप्रवेश व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जीवन पाटील घोगरे तर प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष अतुल हिमगिरे, व युवक प्रदेश सचिव आनंद पाटील शिंदीकर, नांदेड जिल्हा कार्याध्यक्ष हनुमंत पाटील नटूरे, युवक कार्याध्यक्ष माधव चिंचाळे, यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या शहराध्यक्षपदी मुकेश कांबळे यांची निवड करण्यात आली तसेच अनेक युवकाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या कार्यक्रमाप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना जीवन पाटील घोगरे हे म्हणाले की राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार यांच्या आदेशानुसार गाव तिथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची शाखा स्थापन करणार असल्याचे सांगितले. यावेळी जिल्हा सरचिटणीस राहुल चौदंते,भोकर विधानसभाचे युवक अध्यक्ष शेख इरफान,तालुका कार्याध्यक्ष शंकर पाटील गंड्स, तालुका उपाध्यक्ष प्रदीप पाटील महाटीकर, शहर अध्यक्ष महंमद बुरान व मागासवर्गीय विभागाचे तालुकाप्रमुख संतोष दर्शनवाड,सुरज चौदंते,सचिन चौदंते,मुन्ना चौदंते,अजय कांबळे,साई गायकवाड,कपिल हाटकर,सुरज हाटकर,रोहित चौदंते,अभिजित भक्ते रितेश चौदंते,सिद्धांत चौदंते,रोहन कांबळे,अनिकेत चौदंते,दर्शन चौदंते,पवन चौदंते,रंजित चौदंते,हिरामण चौदंते,कुणाल वाघमारे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# शहीद भगतसिंघ चौक ते असर्जन रस्त्याचे काम संथगतीने

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २५ सप्टेंबर -**

शहरातील शहीद भगतसिंग चौक ते असर्जन या रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्यामुळे नागरिक संताप व्यक्त करत आहेत. या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे अन्यथा आक्रमक पवित्रा घेण्याचा इशारा परिसरातील नागरिकांनी दिला आहे.



शहरातील शहीद भगतसिंग चौक असर्जन ते असर्जन या मार्गावर नालीचे बांधकाम जवळपास दोन महिनाभरापुर्वी पूर्ण करण्यात आले आहे. नालीचे बांधकाम थातुर मातुर पद्धतीने पूर्ण करून गुत्तेदार पसार झाले आहेत. तर दुसरीकडे रस्त्याच्या कामासाठी मुरूम टाकण्यात आला, खोदकाम करण्यात आले. परंतु मागील दोन महिन्यापासून संबंधित गुत्तेदार बेपत्ता आहे. रस्ते खोदून ठेवल्यामुळे पावसाच्या पाण्यामुळे रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरले असून या रस्त्यावरून चालण्यासाठी वाहनधारकांसह पादचाऱ्यांनाही तारेवरची कसरत करावी लागत आहे. या रस्त्यावर किरकोळ अपघाताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असुन अपघातात वाहनधारकांना दुखापती होत आहेत. त्यामुळे या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे अशी मागणी परिसरातील असर्जन, धुमाळवाडी, क्रांतीनगर, जयप्रकाश नगर येथील नागरिक करत असून रस्त्याचे काम तातडीने पुर्ण न झाल्यास आक्रमक पवित्रा घेण्याचा इशारा येथील नागरिकांनी दिला आहे.

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना

# लाभापासून वंचित पात्र महिलांनी आधार सिडिंग करून घ्यावे : तहसीलदार यादव

**तभा वृत्तसेवा**
**माहुर, दि. २५ सप्टेंबर -**

मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजना' या योजनेत अल्प उत्पन्न गटातील २१ ते ६५ वयोगटातील महिलांना आर्थिक मदत शासनाकडून दिली जात आहे. या योजनेच्या माध्यमातून अर्ज केलेल्या पात्र महिलांना दर महिन्याला १,५०० रुपये दिले जात आहेत.परंतु,माहूर तालुक्यातील बँक खाते 'आधार सिडिंग' (लिंक) नसल्याने १ हजार ५३० पात्र महिला योजनेच्या लाभापासून अद्यापही वंचित आहेत.प्रलंबित अर्जदारांना संदेश पाठविण्यात आला आहे. संबंधितांनी आपले खाते ज्या बँकेत आहे अशा बँकेत जाऊन 'आधार सिडिंग' करून घ्यावे. असे आवाहन तहसीलदार किशोर यादव यांनी केले आहे.



मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजना' सुरू होऊन जुलै व ऑगस्ट या दोन महिन्याचे ३ हजार रुपये हे पात्र लाभार्थी बहिणींना प्राप्त देखील झाले आहेत. योजनेसाठी ३० सप्टेंबर ही अर्ज करण्याची शेवटची तारीख असून,ज्या पात्र महिलांनी अद्याप अर्ज केला नाही,त्या ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज करुन मागील तीन महिन्यांचे पैसे एकत्र घेऊ शकतात. या योजनेमार्फत महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दर महिना रु.१,५००/- असा आर्थिक लाभ डीबीटी द्वारे देण्यात येत आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी माहूर तालुक्यातून नारीशक्ती पद्वारे १७ हजार ३३५ अर्ज तर,लाडकी बहीण पोर्टल वरुन १० हजार ३८६ अर्ज असे एकूण २७ हजार ७२१ महिलांनी अर्ज भरले होते. त्यापैकी २६ हजार १९१ अर्ज अपलोड झाली असून,उर्वरित१ हजार ५३० महिलांचे बँक खात्याशी आधार सिडिंग नसल्याने त्यांचे अर्ज प्रलंबित आहेत.अशा सर्व पात्र परंतु, आधार प्रलंबित महिलांनी आपापल्या बँक खात्याशी आपले आधार सिडिंग (लिंक) करून घ्यावे असे आवाहन तहसीलदार किशोर यादव यांनी केले आहे.

### आरटीओ कार्यालयातील सेवा फेसलेस सुविधेद्वारे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २५ सप्टेंबर -**

महाराष्ट्र राज्य मोटार वाहन विभाग (आरटीओ) कर्मचारी संघटनेने संप पुकारला आहे. याकाळात नागरिकांना आपले अर्ज आधार लिंक भ्रमणध्वनी क्रमांकाचा येणाऱ्या ओटीपी क्रमांकाचा वापर करून फेसलेस सेवेद्वारे ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येणार आहेत.

## १ हजार १३८ शिक्षकांना निवड श्रेणी प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २५ सप्टेंबर -**

जिल्ह्यातील २४ वर्ष सेवा पूर्ण होऊन निवड श्रेणी प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या अर्हताधारक १ हजार १३८ शिक्षकांना निवड श्रेणी प्रदान करण्यात आली आहे. नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल आणि प्राथमिक शिक्षण अधिकारी डॉ सविता बिरगे यांनी या कामी पुढाकार घेतल्यामुळे शिक्षकांना निवड श्रेणी प्रदान करणे शक्य झाले.

चटोपाध्याय आयोगाच्या शिफारशीनुसार वरिष्ठ श्रेणीतील १२ वर्षाच्या अहर्ताकरी सलग सेवेनंतर निवड श्रेणी लागू करण्यात येते. निवड श्रेणी मिळण्यासाठी संबंधित शिक्षकांनी वरिष्ठ वेतनश्रेणीत १२ वर्षाची सेवा पूर्ण केली असली पाहिजे, सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण केले पाहिजे, प्राथमिक शिक्षकांनी प्रशिक्षित पदवीधराची पात्रता धारण केली पाहिजे. यासाठी २ हजार ७५३ प्रस्ताव कार्यालयास प्राप्त झाले होते. त्यापैकी ४७६ प्रस्ताव अपात्र ठरले असून १ हजार १३८ यासाठी पात्र झाले आहेत.

# नागरी समस्यांनी ग्रस्त व्यंकटेशनगर हा मुदखेड शहराचा भाग आहे की नाही; नागरिकांचा सवाल

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. २५ सप्टेंबर -**

मुदखेड शहराच्या पश्चिमेस असलेल्या नांदेड बायपास जवळील व्यंकटेश नगर भागातील नागरीक नागरी समस्या मुळे हैरान झाले आहेत. नगरपालिके कडून रहीवाश्यांना मुलभुत सुविधा सुद्धा देण्यात येत नाहीत. पुर्ण व्यंकटेश नगर भागात एकही चांगला रस्ता नाही. नाल्यांच्या गटारगंगा झाल्या आहेत. पिण्याचे पाणी सुद्धा दुषित पुरवल्या जात आहे. जागोजागी रस्त्यावर खड्डे पडले आहेत. घणकचरा जागोजागी विखुरला आहे, त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. आणि रोगराई पसरण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे येथील रहिवाशी त्रस्त झाले आहेत. त्यामुळे व्यंकटेश नगर येथील नागरीक आम्ही नगर पालिकेच्या हद्दीत आहोत की नाही असा प्रश्न विचारत आहेत. सन.२००१ साली हा भाग नगर पालिकेच्या हद्दीत समविस्ट करण्यात आला आहे. तेव्हा पासुन या भागाकडे नगर पालिकेच्या वतीने काहीच सुविधा पुरवल्या नाहीत. रस्ते, पाणी पुरवठा, नाल्या, गटारे या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी भाजपाचे युवा कार्यकर्ते प्रकाश सुर्यवंशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी वेळोवेळी नगर पालिकेकडे निवेदनाद्वारे मागण्या केल्या आहेत पण त्यांना योग्य प्रतिसाद मिळाला नाही. खा. अशोक चव्हाण यांच्या प्रयत्नाने नुकतेच मुदखेड शहरातील विविध भागात विकास कामासाठी साडे सहा कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला. त्याचे भूमिपूजन सोहळा पार पडले. पण त्यांना व्यंकटेश नगर येथील खराब रस्ते दिसले नाहीत का? जर त्या निधी मधुन पाच - दहा लाख रुपये व्यंकटेश नगर भागातील नागरी समस्या साठी मंजुर केले असते तर त्यांची समस्या सुटली असती परंतु तसे झाले नाही. त्यामुळे या भागातील नागरीक आम्ही शहराचा भाग आहोत की नाही असा प्रश्न उपस्थित करत आहेत. या भागातच मुदखेड शहर महीला अध्यक्ष सौ. प्रियंका सुर्यवंशी यांचे निवासस्थान आहे. तसेच प्रकाश सुर्यवंशी हे सुद्धा भाजपाचे सरचिटणीस आहेत. त्यांनी वेळोवेळी स्थानिक समस्या साठी नगर पालिकेकडे पाठपुरावा केला, पण त्यांच्या अर्ज - विनत्यांना केराची टोपली दाखवली आहे. या सर्व नाराजीचा परिणाम



येत्या विधानसभा निवडणुकीत होईल व त्याचा फटका महायुतीच्या उमेदवारास बसेल. त्यामुळे व्यंकटेश नगर भागातील नागरी समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी या भागातील रहिवाशी करत आहेत.

# मुक्रामाबादमध्ये खतगांवकरांची विशाल जनसभा; विरोधकांचे दणाणले धाबे !

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २५ सप्टेंबर -**

दिनांक २२ सप्टेंबर रोजी मुक्रमाबाद येथे अखिल भारतीय होलार समाज संघटनेच्या वतीने होलार समाजाचा भव्य मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याची सुरुवात प्लॅनेट इव्हेंट प्रस्तुत महाराष्ट्राची लोकधारा या कार्यक्रमाने झाली. आदिवासी नृत्याने बालाजी पाटील खतगांवकर यांचे मोठ्या जल्लोषात स्वागत केले. उपस्थित मान्यवरांनी दीपप्रज्वलन करून महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन केले.



होलार समाजासाठी तालुका स्तरावर सभागृह व्हावे. बालाजी पाटील खतगांवकर यांनी होलार समाजाचे पालकत्व स्वीकारावे, होलार समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ गठीत व्हावं, अश्या मागण्या होलार समाजाच्या वतीने करण्यात आल्या. महत्त्वाची बाब म्हणजे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी बालाजी पाटील खतगांवकर यांना होलार समाजाने पाठींबा जाहीर केला आहे. या कार्यक्रमाला १५ हजार लोकांनी उपस्थिती दर्शवली होती. इतिहासात पहिल्यांदाच सभेला प्रचंड जनसमुदाय उपस्थित झाला होता. यामुळे खतगांवकरांच्या विरोधकांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

एकीचे बळ अशी संत तुकारामांची म्हण आहे त्याप्रमाणे मुखेड आणि कंधारचे प्रश्न आम्ही एकत्रितरित्या सोडवू. उदगीर- रावी-मुक्रमाबाद-करडखेड-देगलुर या रस्त्याला १ हजार कोटी रुपयांची मंजुरी मिळाली आहे. त्याचबरोबर लेंडी प्रकल्पासाठीही ५०० कोटी रुपयांचा निधी मंजुर होणार आहे. याशिवाय मुखेडमधील एमआयडीसचे काम सुध्दा अंतिम टप्प्यात आले आहे. होलार समाजाची प्रगती होणे खूप गरजेचे आहे. हा समाज शिक्षणापासून दूर आहे. त्यांच्यापर्यंत विकासाची गंगा पोहोचवण्याचे काम आम्ही करू. त्यांचे पालकत्व स्वीकारून त्यांचे पुनर्वसन करू, असे प्रतिपादन बालाजी पाटील खतगांवकर यांनी बोलताना केले.

प्रा. वैजनाथ सुरनर यांनी होलार समाज प्रामाणिक असून आगामी विधानसभा निवडणुकीसाठी संपूर्ण समाज एकजुटीने नीतिमान व्यक्तीसोबत राहील. त्यांना सर्वजण मिळून मुखेड-कंधार मतदारसंघातून आमदार करू, असे आश्वासन दिले. होलार समाज हा अतिशय प्रामाणिक समाज आहे. त्यांचे आभार मानावे तितके कमी आहे. पण त्यांचा विकास झाला नाही. येणाऱ्या काळात आपल्या भागातील प्रश्न सोडवायचे असतील तर आगामी निवडणुकीत बालाजी पाटील खतगांवकर यांना निवडून द्या, असे आवाहन व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांनी केले.

होलार समाजाची एकता म्हणजेच त्यांची ताकद आहे. यामुळे या समाजाने एकत्रितपणे काम करण्याच्या महत्त्वावर भर दिला पाहिजे. जेणेकरून समाजाच्या विकासासाठी सकारात्मक परिणाम साधता येईल. या कार्यक्रमामुळे होलार समाजाच्या सदस्यांमध्ये एकजुटीचा आणि सामूहिक कार्य करण्याचा उत्साह निर्माण झाला आहे, असे श्रीकांत काळे यांनी स्पष्ट केले.

यावेळी प्रा. वैजनाथ सुरनर (मराठवाडा अध्यक्ष,अखिल भारतीय होलार समाज तथा दलित मित्र पुरस्कार प्राप्त महाराष्ट्र शासन), व्यंकटराव पाटील गोजेगावकर (माजी शिक्षण सभापती जिल्हा परिषद, नांदेड), बालाजी पाटील खतगांवकर (खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य), माधवराव होनमाने (जिल्हाध्यक्ष, अखिल भारतीय होलार समाज संघटना, नांदेड), सुभाषराव काटे (शिवसेना माजी जिल्हा प्रमुख लातूर), नामदेवराव देवकाते (मुखेड तालुकाध्यक्ष), चंदरराव ताळीकोटे (माजी सभापती, कर्नाटक, ता. औराद), उत्तम वाडीकर (सरपंच सुगाव), श्रीकांत काळे (मा. सरपंच बेन्नाळ) यांच्यासह होलार समाज बांधव, ग्रामस्थ आणि महिला देखील मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या.